# अभ्यंतर



विनीता देशपांडे

## अभ्यंतर

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : संकलकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल व ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अभ्यंतर

विनीता श्रीकांत देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# अभ्यंतर


## लेखिका : विनीता श्रीकांत देशपांडे

फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क संकलकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संकलकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : १४ नोव्हेंबर २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



विनीता श्रीकांत देशपांडे

एम.ए.(मराठी), एम.ए(इंडॉलॉजी)

विनीताजींच्या प्रतिभेचा आवाका कथा, कविता, कादंबरी, समिक्षा लेखन, आकाशवाणी पुणेकेंद्रावरून काव्यवाचन, अनेक मासिक, दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांसाठी लेखन असा व्यापक आहे. "स्मृत्पर्ण" या ई-साहित्य प्रकाशित पहिल्या कादंबरीवर वाचकवर्ग आपल्या प्रतिक्रिया पाठवत आहेत. ई- साहित्य प्रकाशित "मराठी कवितेच्या पाऊलखुणा" इ.स.हे सन १८०० ते सन१९०० याकाळातील कवि आणि त्यांच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे. या वर्षीच त्यांची फ़ुल्लारी ही कादंबरीही प्रकाशित झाली आहे. रंगीला रे कादंबरी याच वर्षी प्रकाशित झाली.


आगामी साहित्य- "भवताल" कथासंग्रह, "पारुषण" गुढकथासंग्रह, , आधुनिक मराठी कवितेच्या पाऊलखुणा(इ.स.१९००च्या पुढचा काव्यप्रवास)

विनीताजींचे कार्यक्षेत्र केवळ लेखनापुरते मर्यादित नसून त्या होप ऍन्ड हॅप्पीनेस फाँऊंडेशनची संस्थापक आहेत, तसेच अनेक सामाजिक उपक्रम ई-कचरा संकलन, गरजूंसाठी शालेय साहित्य संकलन, वृद्धाश्रमासाठी उपक्रम, विशेष मुलांसाठी उपक्रम, 10000books.in ची एन.जी.ओ.पार्टनर असा विविधांगांनी पसरलेला आहे.

संपर्क- फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४


मो.नं. ७०५७५७४२७२


मेल- vsdeshpande14@gmail.com










- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/paoolkhuna_vinitadeshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/smrutparn.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/fullari_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/rangeela_vinita_deshpande.pdf



**भाग्यश्री काळे - पाटसकर.**
**एम.ए.एम.फील (भारतीय विद्या)**
**एम.ए.पीएच.डी (पुरातत्वशास्त्र)**

विनिता देशपांडे यांच्या अभ्यंतर या लघुकादंबरीने वाचकांना सम्राट अशोकाच्या काळात नेण्याची किमया साधली आहे. इतिहासपूर्व काळातील पात्रे आपल्यासमोर जिवंत होतात. लोकोत्तर, अलौकिक कार्य करणाऱ्या सम्राटाची विचारप्रक्रिया उलगडत जाते. सत्तापिपासू योद्धा ते ज्ञानोपासक विचारवंत असा अशोकाचा प्रवास उद् बोधक आहे.

ऐतिहासिक आणि त्यातही इतिहासपूर्व काळातील जीवन उलगडणारे ललित लेखन अभावानेच आढळते. त्या काळातील जीवन, प्रसंग आणि व्यक्ती यांची पुरेपूर आणि योग्य माहिती असणे आवश्यक आहे. विनिता देशपांडे यांनी अभ्यासपूर्वक लेखन केले असल्याने योग्य वातावरण निर्मिती झाली आहे.

मौर्य साम्राज्य आणि सम्राट अशोक हा इतिहासाच्या विद्यार्थ्यांना नेहमीच आवडणारा उत्कंठावर्धक विषय आहे. सोळा जनपदे आणि सोळा महाजनपदे एकत्र करून, परकीयांचा बंदोबस्त करून प्रचंड राज्यविस्तार करणारा अशोक हा जगभर प्रसिद्ध आहे त्याच्या धर्मप्रसार कार्यासाठी. देशभर विविध ठिकाणी शिलालेखांची योजना करून आपले विचार प्रजेपर्यंत पोहोचवण्याचा त्याने प्रयत्न केला. अशिक्षित जनतेला शिलालेखातील मजकूर समजावून देण्यासाठी धर्मअध्यक्षमहामात्र नेमले. महिला वर्गाशी संवाद साधणे सहज व्हावे म्हणून स्त्रीअध्यक्षमहामात्र नेमल्या. प्रजेचा इतका विचार करणारा शासक या

देशात इ.स.पूर्व २७०-५० च्या आसपास राज्य करत होता. ही माहिती उत्कंठावर्धक आहे.

अशा दुर्लक्षित विषयांवर लेखन होणे आवश्यक आहे . त्यामुळे प्राचीन इतिहासाबद्दल आपलेपणा वाढेल त्यातून अभ्यास वाढेल. इतिहासाचा अभ्यास म्हणजे फक्त सनावळी आणि युद्धे एवढेच नव्हे. तत्कालीन लोकांचे जीवन , विचार आणि भावना जाणून घेण्यासाठी प्रयत्न होत आहेत. असे ललित लेखन हा त्याचाच एक भाग म्हणायला हरकत नाही.

विनिता देशपांडे यांची ही साहित्यकृती आश्वासक आहे. लेखिकेकडून अधिक सकस, विस्तृत आणि अभ्यासपूर्ण लेखनाची अपेक्षा वाढवणारी आहे. त्यांच्या पुढील लेखनासाठी शुभेच्छा !



- डॉ. सुधीर रा. देवरे

एम.ए.पीएच.डी(मराठी)

भाषा,कला, लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकवाङ्मय यांचे अभ्यासक

ऐतिहासिक मौर्य साम्राज्य व चंद्रगुप्त मौर्य यांच्या राज्यकाल व्यवस्थेवर प्रकाश टाकणारी विनीता देशपांडे लिखित ‘अभ्यंतर ’ नावाची लघुकादंबरी आज दखलपात्र ठरावी.

इसवी सन पूर्व 322 ते इसवी सन पूर्व 298 हा कालखंड आणि या काळातल्या भाषा, लिपी, साहित्यशास्त्र, विद्या, शिल्प, कला आदींसह सदर कादंबरीत ऐतिहासिक व्यक्तीमत्वांवर वस्तुनिष्ठ प्रकाश पडतो.

केवळ इतिहासाचा सखोल अभ्यास करून नव्हे, तर हा अभ्यास पचवून ही कलाकृती लेखिकेने निर्माण केलेली आहे. लालित्याने बहरलेली जुनी व संस्कृतप्रचुर मंत्रमुग्ध भाषा कादंबरीत वाचायला मिळते. ललित लिखाणातला हा ऐतिहासिक दस्तऐवज म्हणता येईल. कादंबरीत उपयोजित झालेला विशिष्ट काळ आणि तिथला परिवेश शब्द माध्यमातून कादंबरीत उजळून निघतो.

ऐतिहासिक असूनही कादंबरीतली भाषा अवजड होत नाही. शक्य तितक्या प्रवाही भाषेत कादंबरी सिध्द करायचा लेखिकेचा प्रयत्न स्तुत्य आहे. विशेष म्हणजे एखाद्या संशोधनात्मक प्रबंधाला जोडावी तशी संदर्भ ग्रंथांची सूचीही कादंबरीला जोडण्यात आली आहे. म्हणून ही कादंबरी केवळ साहित्य रसिकांनीच नव्हे, तर इतिहासाच्या विद्यार्थ्यांनीही आवर्जून वाचावी अशी कलाकृती आहे.



**डॉ.नीलिमा थत्ते**

**एम.बी.बी.एस., एम.ए(भारतीय विद्या) एम.ए.(संस्कृत)**

सम्राट अशोक म्हटल्यावर कलिंग युद्धातला भीषण संहार आणि त्यानंतर अशोकात झालेला आमूलाग्र बदल एवढ्या दोनच गोष्टी आठवतात. पण अशोक त्यापेक्षा अधिक काही आहे. मौर्य घराण्याचा जबरदस्त वारसा लाभलेल्या अशोकाला साम्राज्य विस्ताराची महत्वाकांक्षा असणं खूप स्वाभाविक होतं, परंतु तिचे परिणाम पाहिल्यावर लोकांच्या मनात स्थान मिळवण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न अतुलनीय आहेत. कुठल्या विशिष्ट धर्माच्या चौकटीत न अडकता एक स्वतःचा वैश्विक धर्म निर्माण केला त्याने. त्याच्या आयुष्यातला असाच एक अपरिचित भाग प्रकाशात आणण्याचं महत्वाचं काम विनीता देशपांडे यांनी केलं आहे. सव्वादोन हजार वर्षांपूर्वीच्या इतिहासाला जिवंत करून त्याचा धागा वर्तमानाशी अलगद जोडला आहे. सर्वच व्यक्तींचे चित्रण प्रभावी झाले आहे. पण चतुर, स्वामीनिष्ठ,भावनाप्रधान असूनही तितकीच कर्तव्य परायण अशी अंतरा आपल्या अंतरात खास स्थान मिळवते.



**इंद्रनील बंकापुरे**

**इंडोलॉजिस्ट आणि हेरिटेज एक्सपर्ट**

**संस्थापक- "विरासत" Indian Heritage Initiative**

दोन - सव्वादोन हजार वर्षांपूर्वीचा तो काळ ही कादंबरी वाचताना डोळ्यासमोर उभा राहतो. कुठली तरी ताकद मिळवण्यासाठी केलेली धडपड आणि ती शक्ती हातात आल्यावर मनावर पसरलेली खिन्नता हा सत्तेत असणाऱ्या आणि त्यासाठी प्रयत्न करणाऱ्या बहुतांश राजांच्या चारित्र्याचा एक महत्वाचा भाग आहे. सम्राट अशोक देखील यातून वाचला नाही. या मनाच्या वादळात एखादा आधाराचा ओंडका सापडतो का? या मनस्थितीत असणारा तो सम्राट अभ्यंतर वाचताना समोर उभा राहतो. या कादंबरीतील महत्वाचा गाभा असा आहे की लेखिकेने फक्त प्रश्न उपस्थित करून न ठेवता त्या प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. बाकी प्रत्येकाचे मन वेगळे आणि त्या मनाला भिडणारी गोष्ट वेगळी.

कादंबरी वाचताना  कथानकाला कुठेही तडा जाऊ दिलेला नाही, सुंदर आणि सोप्पी भाषा हे अजुन एक वैशिष्ट्य.

सर्वांनी खरचं एकदा वाचून बघा. विनिता ताई, तू केलेले प्रामाणिक कष्ट या लिखाणातून जाणवतात. पुढच्या कादंबरीची वाट बघतोय.



**चंद्रशेखर जोगदेव**

**बी.ई(मेकॅनीकल), एम.ए.(इंडोलॉजी)**

अभ्यंतर या कादंबरीचे विशेष म्हणजे ती समाजव्यवस्थेवर आधारित असून आजच्या काळात या विषयावर विचार करायला लवणारी आहे. सम्राट अशोकने अखंड भारतावर दीर्घकाळ राज्य केले. तो एक शूरवीर योद्धा तर होताच, एक अनुशासित आणि सुनियोजित शासनव्यवस्थेसाठी त्याने केलेले प्रयत्न या कादंबरीत मांडले आहे. कलिंगयुद्धानंतर सम्राट अशोकच्या जीवनाचा या कथानकात घेतलेला आढावा, त्याची मनस्थिती, समस्त भारतात सर्वधर्मसमभाव साधण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न आणि ज्ञानकोशाची गुंफण लेखिकेने लीलया गुंफली आहे. कथानकातील भाषाप्रयोग तुम्हाला गतकाळात घेऊन जातो. अभ्यासपूर्ण असलेले हे लेखन नक्की वाचा.

विनीता, पुढच्या लेखनास खूप खूप शुभेच्छा.

**LEELABAI ANANDRAO PRADHAN**



श्री ।।

लीला आनंदराव
प्रधान
७६७/२८ पांडवनगर
पुणे ४

सौ. विनिता देशपांडे हिने लिहिलेले

आत्यंतर संपूर्ण व बारकाईने वाचले आहे. अत्यंत अभ्यासू
वृत्ती, सोपी सरळ भाषा समजण्यास अत्यंत सोपी. अशी त्यांची
मांडणी आहे. समाज कार्यकर्त्यां, राज्यकर्त्यां, त्यांच्यांशी देणाऱ्या
खबरदारी व राजनैतिक अधिकारी यांना नेमून दिलेले कर्तव्ये
खूपच चांगले असून, ते आजच्या काळातही लागू होतात.
सौ. विनिताचे मनःपूर्वक आभार व आशीर्वाद.
तिला पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

लीला आ. प्रधान.

अर्पण पत्रिका

सत्येन धार्यते पृथ्वी सत्येन तपते रवि:।

सत्येन वाति वायुश्च सर्वं सत्ये प्रतिष्ठितम्॥

(कौटिल्य)

अखंड भारताचे स्वप्न साकार करणाऱ्या विजिगीषु नृपतीला समर्पित.

# अभ्यंतर

**मौर्य साम्राज्य- एक आढावा**

मौर्य साम्राज्य म्हणजे भारताच्या इतिहासातील पहिले सुसंघटित, अनुशासित आणि सुनियंत्रित साम्राज्य. चंद्रगुप्त याने नंद वंशाचा नाश करून आचार्य चाणक्याच्या साह्याने मौर्य साम्राज्याची स्थापना केली. मौर्यसाम्राज्य आदर्श सामाजिक जीवनाचा पुरस्कार करणारे साम्राज्य होते. चंद्रगुप्तने ग्रीक राजा अलेक्झेंडरचा सरदार सेल्युकस निकेटर याला पराभूत करून वायव्येची राज्ये जिंकली. तसेच सेल्युकसकन्या हेलेनाशी विवाह करून एक ऐतिहासिक तह केला आणि इथून परकीय राज्यासोबत मैत्रीच्या पर्वास आरंभ झाला. या तहामुळे चंद्रगुप्ताच्या शौर्यगाथेचा भारताबाहेर प्रसार झाला. तत्कालीन सामर्थ्यवान साम्राज्य इजिप्त आणि सिरिया यांनी चंद्रगुप्तच्या दरबारात राजदूतांची नेमणूक केली. ग्रीक राजदूत मेगॅस्थेनिस याने मौर्यांच्या पराक्रमाने प्रभावित होऊन "इंडिका" ग्रंथ लिहिला.

उपलब्ध ऐतिहासिक पुराव्यांवरून बलुचिस्तान, अफगानिस्तान, गांधार, हिंदुकुश पर्वतरांग, काबुल, विंध्यपर्वताचा प्रदेश, बिहार, बंगाल, ओरिसा, दख्खन, महाराष्ट्र, आणि मैसुर पर्यन्त चंद्रगुप्त मौर्यचे(राज्यकाल इ.स.पू.३२२ ते इ.स.पू.२९८) साम्राज्य होते.

चंद्रगुप्तच्या पश्चात त्याचा पुत्र बिंदुसार(राज्यकाल इ.स.पू. २९७ ते इ.स.पू.२७२) मौर्यसाम्राज्याचा उत्तराधिकारी होता. चंद्रगुप्त काळात जे प्रदेश मौर्यसाम्राज्यात नव्हते (दक्षिणपथावरील प्रदेश) ते बिंदुसाराने जिंकले. आचार्य चाणक्यच्या मदतीने चंद्रगुप्तने जी अनुशासित व्यवस्था प्रस्थापित केली होती तीच व्यवस्था बिंदुसारने पुढे नेली.

बिंदुसारची इच्छा सुशीमला उत्तराधिकारी नेमण्याची होती. मात्र अशोक याने काही मंत्र्याच्या मदतीने साम्राज्यावर आपले सामर्थ्य सिद्ध केले. मौर्य साम्राज्याबद्दल माहिती कौटिल्यचा ग्रंथ "अर्थशात्र", मेगॅस्थेनीसचा ग्रंथ "इंडीका" बौद्ध आणि जैन साहित्यातील उल्लेख तसेच सम्राट अशोकच्या कारकिर्दीची माहिती अनेक ऐतिहासिक पुराव्यांमधून उपलब्ध होते. त्याच्या चंड अशोक ते  देवानां प्रिय असा धर्म अशोक हा प्रवास भारतातील विविध प्रांतात उपलब्ध शिलालेख, प्रस्तरलेख, स्तंभलेख, स्तुप, चैत्यगृह यातून उलगडतो.

सम्राट अशोकचे एकूण तीस "अशोकस्तंभ" होते. त्यापैकी दहा स्तंभांवर धर्माज्ञा कोरल्या होत्या. सारनाथ येथील सिंहचतुष्ट्य स्तंभ आज आपल्या शासनाची राजमुद्रा आहे. मौर्य काळात धार्मिक स्थिती बळकट झाली होती, आर्थिक जीवन समृद्ध होते, साहित्य-शास्त्र-भाषा-लिपी-विद्या-कला-स्थापत्य-शिल्प-नाट्य हे सर्व क्षेत्र समृद्ध झाले होते.

सम्राट अशोकपश्चात मौर्य राजांचे परकीय राज्यांशी असलेले मैत्रीपूर्ण संबध बिघडले. याचा व्यापारावर परिणाम झाला. योग्य आणि दूरदर्शी नेतृत्वाच्या अभावामुळे अखंड भारतावर असलेले एकसूत्री नियंत्रण संपले. आंतरिक कलहामुळे राजकीय आणि सामाजिक अस्थिरता पसरली. इतिहासाची पुनरावृती झाली. ज्याप्रमाणे नंदाचा नाश करून चंद्रगुप्ताने मौर्य साम्राज्याची स्थापना केली त्याच प्रमाणे मौर्य राजा बृहद्रथचा( इ.स.पू.१८७) त्याचा सेनानी पुष्यमित्राने वध करून शुंग साम्राज्याची स्थापना केली आणि मौर्य साम्राज्याचा अस्त झाला.

## मनोगत

(बिंदूसारच्या मृत्युपश्चात चार वर्षांनी अशोकचा राज्याभिषेक (इ.स.पूर्वी२६८) झाला. पुढे आठ वर्षानंतर कलिंगयुद्ध झाले. या युद्धानंतर सम्राट अशोकने जवळपास तीस वर्षे राज्य केले. चंद्रगुप्त मौर्यने चाणक्यच्या साह्याने जी अनुशासित साम्राज्यव्यवस्था उभी केली होती, बिंदूसारने तेच अनुशासन कायम ठेवले. पुढे सम्राट अशोकने राज्यकारभार हाती घेतला तेव्हा व्यवस्था शिस्तबद्ध आणि अनुशासित होती. साम्राज्यविस्तार करण्यामागे चाणक्यने अर्थशास्त्रात नमुद केलेली विजीगिषु राजाची संकल्पना मांडली आहे ती सिद्ध करण्याचा सम्राट अशोकचा अट्टहास होता का? मौर्य साम्राज्य हिंदुकुश ते बंगाल उपसागर, हिमालय ते म्हैसुरपर्यन्त  पसरले होते.  तसेच चोल, पांड्य, सतियपुत्र, केरलपुत्र, ताम्रपर्णी यांना सम्राट अशोकचे अभय होते. खरं तर कंलिंगयुद्धानंतर साम्राज्यविस्ताराचा प्रश्नच उद्भवत नाही. भेरीघोष कोणासाठी झाला असता? आजचा संपूर्ण भारत, पाकिस्तान, अफगानिस्तान, नेपाळ, बांगलादेश, भुटान, म्यानमारच्या अधिकांश भूभागावर सम्राट अशोकचे साम्राज्य प्रस्थापित होते. या विशाल साम्राज्यामुळे त्याची गणना विश्वातील महानतम आणि शक्तिशाली चक्रवर्ती सम्राट म्हणून केली जाते. इ.स.पूर्वी २३२मध्ये सम्राट अशोकचे निधन झाले. सम्राट अशोकनंतर त्यांच्या इतका तुल्यबल असा एकही वारस मौर्यांच्या गादीवर आला नाही. अशोकपुत्र जालौकने कश्मीरप्रांतात स्वतंत्र राज्य स्थापन केले. अशोकपुत्र कुणालने मात्र आठ वर्षे राज्य केल्याची नोंद इतिहासात आहे. नंतर कुणालपुत्र दशरथ, नंतर दशरथपुत्र संप्रतीने राज्य केले. त्यानंतर शालिशूक, देववर्मा, शतधनुष्य हे राजे होऊन गेले. बृहद्रथ हा मौर्यवंशातील शेवटचा राजा होता. इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

बृहद्रथाचा त्याचा सेनानायक पुष्यमित्र शुंग याने वध केला आणि मौर्यसाम्राज्याचा अस्त झाला. कालचक्रात या इतिहासाची पुनरावृत्ती होत गेली.

कलिंगयुद्धानंतर या तामस राजात अमुलाग्र बदल घडून आला हे सर्वमान्य आहे. या धर्तीवर हे कथानक आहे. युद्धातील भीषण संहार बघून उद्विग्न सम्राट मन:शांतिसाठी त्यांचे बंधू तिस्स कडे जातात.

मनःशांतिच्या शोधात सम्राट अशोकला अद्वितीय ज्ञानाचा शोध लागतो. एका विशाल समाजव्यवस्थेचा पाया रचणाऱ्या सम्राट अशोकची अभ्यासक आणि संशोधक वृती त्यांना एका ज्ञानकोशाची निर्मिती करण्यास प्रवृत्त करते. हा ज्ञानकोश म्हणजे नऊ विषय नऊ ग्रंथ. या नऊ ग्रंथाचा प्रवास या अभ्यंतरमध्ये मांडण्याचा माझा हा प्रामाणिक प्रयत्न. इतिहासातील बहुतांश पानं रक्तरंजीत असले तरी त्यातून बोध घेण्यास योग्य इतर अनेक गोष्टी असतात. मौर्य साम्राज्यातील सम्राट अशोकच्या इतिहासाच्या पानातून मी निवडलेलं अखंड भारताचं स्वप्न वाचकांना आवडेल अशी आशा करते.)

(विनीता श्रीकांत देशपांडे)

# अभ्यंतर

## १

आकाशात संधीप्रकाश विखुरला होता. केशरी प्रकाशात युद्धभूमीवरील दृष्य अतिशय भयंकर दिसत होते. विजयाची वार्ता घेऊन सैन्याची एक तुकडी पाटलीपुत्रच्या दिशेने निघाली. चंडअशोक विजयोत्सव साजरा करण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याक्षणी विजयनाद त्याला कर्णकठोर वाटत होता. त्यापासून पलायन करावसे वाटत होते. क्षुब्ध झालेला तो अश्वावर आरुढ झाला आणि त्याने पाटलीपुत्रच्या दिशेने प्रस्थान केले.

कलिंगवरून परततांना सम्राट अशोकच्या डोळ्यासमोरून युद्धभूमीवरील भेसूर दृष्ये एकामागून एक फिरत होते. आकाश भेदणारे रुदन, काळजाचा ठाव घेणारी आर्तता, सर्वत्र साचलेले रक्ताचे थारोळे, जीव उराशी घेऊन विनाशक विध्वसांतून पळत सुटलेले सैन्य, इतस्ततः वेदनेने खिंकाळणारे अश्व आणि हत्ती, रणांगणात निपचित पडलेले तेजस्वी अस्त्र-शस्त्र, भीषण संहार बघून विमनस्क झालेले उरलेसुरले सारथी, माहूत, वैद्य आणि त्यांचे सहकरी. "विजयाच्या शंखनादाने दुमदुमलेली रक्तरंजीत युद्धभूमी आक्रंदित त्याचा पाठलाग करत आहे आणि तो जीव मुठीत घेऊन पळत आहे..." असा सम्राट अशोकला भास झाला. इतर सैनिकांना मागे टाकत

त्याने अश्वाची गती वाढवली. अश्वाच्या टापांच्या आवाजात हा आभास आणि विजयाचा शंखनाद क्षीण होत गेला.

पाटलीपुत्रच्या सीमेवर त्याचे स्वागत झाले. या विजयाचा त्याला अजिबात आनंद झाला नव्हता. आरतीच्या तबकातील निरांजनाची ज्योत त्याला एखाद्या ज्वालेप्रमाणे भासत होती. युद्धभूमीवरील भीषण आठवणी त्याचा पाठलाग सोडत नव्हत्या. कोणाशी वार्तालाप न करता घाईघाईने त्याने महालात प्रवेश केला. पुष्पवृष्टीने न्हाऊन निघालेल्या त्या अनुतप्त देहाने रक्तरंजीत स्मृती ओसरण्यासाठी स्नानगृहातील पाण्याच्या विशाल हौदात स्वतःला झोकून दिले आणि सुगंधी पाण्याच्या तुषारात दाह कमी करण्याचा तो निष्फळ प्रयत्न करु लागला.

"सम्राट शांत झाले असतील तर काही बोलायचे होते." राधागुप्तने काही काळ गेल्यावर विचारले.

"युद्धासंबधी चर्चा करायलाच हवी का?" सम्राटने टाळी वाजवत दासीला वस्त्र आणण्याचे संकेत दिले.

"आवश्यक आहे सम्राट. कलिंगमधील युद्धाचा समस्त जमाखर्च भद्रसेन दोन दिवसात सादर करणार आहे." राधागुप्त

"युद्धात वीरगतीला प्राप्त सैनिकांच्या कुटुंबांना योग्य ती मदत पोहचली आहे. त्या सर्वांना मानवंदना देऊन उद्या मध्यान्ही अंत्यसंस्कार करण्यात येतील." अंतरा सम्राटच्या हाती उपरणे देत म्हणाली.

"तत्पश्चात संध्यासमयी नृत्यविभागाने विजयोत्सवाचे आयोजन केले आहे." राधागुप्त

"महाअमात्य, विजयोत्सवाचे आयोजन करु नका." सम्राट अशोक

"सम्राट, आपले स्वास्थ्य ठीक नाही का?" अंतरा

"मनस्वास्थ्य ठीक नाही." सम्राट

"आल्यापासून बघते आहे सम्राट आपण विचलित आहात. आपल्याला या विजयाचा आनंद झाला नाही का?" अंतरा

"तेच तर कळत नाही अंतरे. ...ही तगमग...ही अगतिकता...मन विषण्ण झाले आहे. विचारांभोवती कसलेसे वलय चढले आहे. या जळजळणाऱ्या जाणीवा माझ्या मलाच कळत नाही." सम्राट अशोक

"सम्राट, आपण थोडावेळ श्रमपरिहार करावा. महाराणी देवी आपल्या प्रतिक्षेत आहेत." अंतरा

"हो अंतरे, आता महाराणींची प्रकृती कशी आहे?" सम्राट

"बाळाचा गर्भातच मृत्यु झाल्याचे कळल्यापासून त्या विचलित होत्या. कधीच आई होऊ शकणार नाही हे कळल्यापासून त्या अत्यंत

शोकाकूल झाल्या आहेत. मी तिस्सला बोलावले होते. त्यांना भेटल्यानंतर आता त्या बऱ्याच शांत झाल्या आहेत." अंतरा

"मी त्यांचे सांत्वन करतो. तू आहेस म्हणून मला काळजी नाही अंतरे." म्हणत सम्राट महाराणी देवीच्या कक्षेकडे निघाले

"अंतरे, विचारांपासून परावृत्त करण्याची तुझी ही कला कौतुकास पात्र आहे." महाअमात्य राधागुप्त टाळ्या वाजवत म्हणाले

"कला नाही ती महाअमात्य. एका वेदनेतून निसटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे दुसरी वेदना, दुसऱ्या वेदनेची चाहूल पहिल्या वेदनेस जरा काळ का होईना बाजूला करते. तोवर पूर्वीच्या वेदना अंगवळणी होतात आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडतो." अंतरा

"आर्य, या युद्धात जीवितहानी फार मोठ्या प्रमाणात झाली आहे. या कारणाने सम्राट विचलित आहेत. म्हणूनच त्यांनी विजयोत्सव स्थगित करण्याचे आदेश दिले असावे? " अंतराने राधागुप्तला विचारले

"हो, आल्यापासून सम्राट अस्वस्थ आहेत."  राधागुप्त

"रात्रीच्या गहन अंधारात कदाचित सम्राट अशोकच्या मनोव्यथा विरून जातील. प्रातःसमयी आपले महाराज पूर्ववत असतील." अंतरा आशेने म्हणाली

-------००००--------

नेहमीप्रमाणे दरबार भरला. कलिंगयुद्धाचे गंभीर परिणाम सर्वांना ज्ञात होते. सम्राट अशोकच्या चेहऱ्यावर संतापमिश्रित काळजी बघून परिषदेतील एकाही मंत्र्याचे विजयाच्या शुभेच्छा देण्याचे धैर्य झाले नाही. आज दरबारात युद्धसंबधित चर्चा करण्यात आली.

दरबार संपल्यावर वरिष्ठ मंत्र्यांना आवश्यक ते निर्देश देत अंतरा सम्राटच्या दिशेने लगबगीने निघाली. एरवी सिंहासारख्या असलेल्या त्यांच्या चालीतील ऐट आज कुठेतरी हरवली होती. दरबारात विचारविनिमय करतांना त्यांच्या धारदार आवाजाला कंप सुटला होता. सवयीप्रमाणे सिंहासनावरून उठतांना आणि बसतांना काष्ठशिल्पातील सिंहाच्या आयाळावरून कौतुकाने हात फिरवला नव्हता. सिंहासनावर बसतांना डोळयात उठणारी गर्वाची चमक आज लखलखली नव्हती. सम्राट अशोकच्या तनामनात वावरणाऱ्या वेदनांचा कल्लोळ सहजासहजी शांत होणार नाही हे एव्हाना तिला लक्षात आले होते.

"सम्राट, अभय असेल तर एक विचारू?" अंतरा

"बोल अंतरे." सम्राट

"आजच्या बैठकीत युद्धनियमांमध्ये फेरबदल केलेत तर काही रद्द केलेत. या संदर्भात परिषद आपला अहवाल प्रस्तुत करणार असली तरी इतक्या तातडीने हे करण्याची आवश्यकता होती का?" अंतरा

"प्रश्न आवश्यकतेचा नसून परिणामांचा आहे. युद्धानंतरचे परिणाम बघितल्यावर मी आवश्यक ते बदल केलेत." सम्राट

"सम्राट आपण कलिंगयुद्धाने आहत झाले आहात. आपण या निर्णयावर परत एकदा विचार करावा." अंतरा खाली मान करत म्हणाली

"ठीक आहे. मी पुन्हा एकदा विचार करतो. " सम्राट

"तिस्स कुठे आहे? मला त्याला भेटायचे आहे." सम्राट

"त्यांना शीघ्र संदेश पाठवते." अंतरा

"नको, तो जिथे असेल मी जाऊन भेटीन त्याला." सम्राट

"महाराणी देवी यांचा कक्ष आला महाराज. थोडा वेळ विश्रांती घ्या. मी तिस्ससंबधित सुचना देते." अंतरा

------०००० -----

"सम्राट, भदन्त तिस्स पाटलीपुत्रच्या वेशीवर थांबले आहेत. ब्रह्मप्रहरी प्रस्थान करणार अशी वार्ता आहे." अंतरा

"भोजनपश्चात महाअमात्य राधागुप्त आणि चार अंगरक्षकांसमवेत आम्ही तिस्सची भेट घेण्यास प्रस्थान करु. व्यवस्था करण्यात यावी." सम्राट अशोक

"जशी आज्ञा सम्राट." अंतरा

"पूर्वेकडच्या आणि पश्चिमकिनाऱ्यावरील बंदरावरून काही बातमी?" सम्राट

"हो. प्रथमप्रहरी आर्य कच्छप यांचे आगमन झाले आहे. महत्वाची बातमी आहे." अंतरा

"नेहमीच्या ठिकाणी भेटण्याचा त्यांना संदेश पाठवा." सम्राट

"ते ग्रंथालयात आपली प्रतीक्षा करत आहेत" अंतरा

"चल अंतरे." सम्राट

"कच्छप, काय वार्ता आहे?" सम्राटने अंतराला ग्रंथालयाचे द्वार बंद करण्याचे संकेत देत विचारले

"सम्राट, समुद्रापलीकडचा व्यापार व्यवस्थित सुरु आहे. दार्शनिकाने अंतिओकस द्वितीयच्या भेटीस प्रस्थान केले आहे." कच्छप

"पण्य आणि प्रतिपण्यच्या मुल्यांकनाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे असा संदेश सन्निधाता आर्य बलधाम यांनी पाठवला आहे." कच्छप

"व्यापारातील कोणत्या तृटींबद्दल तुम्हाला बोलायचे होते?" सम्राट

"श्रावस्ती, मगध, अवन्ती आणि माध्यमिका येथे मी वैदेहकाच्या वेषात भ्रमण करत असतांना लक्षात आले की कामान्तिकाची नजर चुकवून अभिज्ञानमुद्रांकित न करता क्रयविक्रय सुरु आहे." कच्छप

"या संबधित पुढचे नियोजन तुम्हाला लवकरच कळविण्यात येईल. तोपर्यन्त वैदेहकाच्या वेषात भ्रमण सुरु ठेवा." सम्राट

"सम्राट, तक्षशिलेस यूनानींचे आपसात भेटीचे प्रमाण वाढले आहे. त्यांच्या स्थानिक विद्रोहकांशी भेटी द्रोहाचे संकेत देत आहेत. गुप्तचर त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहे." कच्छप

कच्छपच्या भेटीने सम्राट अस्वस्थ झाले होते. कृषि पाठोपाठ व्यापार हे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. व्यापरातील असले अडथळे शीघ्र दूर करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांनी या संदर्भात न्यायालयीन प्रक्रिया सुरु करण्याचे तसेच युनानींच्या भेटींवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिलेत. या

विचारांमध्ये मग्न त्यांचे आज भोजनात लक्ष नव्हते. भोजन आटपून ते महाअमात्य राधागुप्तसह तिस्सला भेटायला निघाले. पाटलीपुत्रच्या वेशीवर असलेल्या गुहाश्रयाबाहेर अश्व अंगरक्षकांसुपूर्त करत सम्राट घाईघाईने तिस्सकडे झेपावले.

"काय झालं चक्रवर्ती, एवढे उद्विग्न का?" तिस्सने सम्राटचे पाणावलेले डोळे बघून विचारले

"तिस्स, जिंकूनही हरलो आहे मी." सम्राट दीर्घ श्वास घेत म्हणाले

"प्रिय बंधू, मला गवसलेले ध्येय आणि मनःशांती सर्वस्वी तुझ्यामुळे आहे. मी तुझ्यासाठी काही करु शकलो तर माझ्यासाठी तो अत्यानंदाचा क्षण असेल. बंधू वा साधू, कुठल्याही नात्याने माझ्याशी वार्ता करु शकतो." तिस्स

"तिस्स, आज माझ्या प्रजेकडे दृष्टीक्षेप टाकता मला जाणवले, मी त्यांच्यावर माझ्या अपेक्षांच ओझं लादतोय का? माझ्या महत्वाकांक्षेसाठी त्यांचे जीवन उध्वस्त करतोय का? प्रजेचा माझ्यावर असलेल्या विश्वासाचा मी गैरवापर करत नाही ना?

नुकत्याच जिंकलेल्या युद्धामुळे माझ्याविषयी त्यांच्या मनात संताप येणार नाही ना?" सम्राट अशोक

"एकाच समयी किती प्रश्न उद्भवलेत? सम्राट अशोकच्या मनावर आघात करण्याचे दुस्साहस कोणी केले?" तिस्स

"तिस्स?" सम्राट अशोक रागाने म्हणाले

"बंधु, तुम्ही मनःशांतीच्या शोधात इथवर आलात, एकदा नालंदाला चला. तुमच्या समस्त प्रश्नांची उत्तरे तिथे निश्चित गवसतील." तिस्स

"आमच्या उपासनेची वेळ होत आहे. ब्रह्मप्रहरी मी प्रस्थान करणार आहे. निर्णय तुमचा आहे." निशब्द अशोककडे बघून तिस्स म्हणाले

"प्रातः येतो. प्रतीक्षा करा." सम्राट अशोक नमस्कार करत म्हणाले

पाटलीपुत्रास परततांना सम्राट गंभीर झालेले बघून राधागुप्त बोलता बोलता शांत झालेत. ते महालात पोहचले तेव्हा महाराणी आणि अंतरा त्यांची प्रतीक्षा करत होत्या.

"महाअमात्य, आम्ही उद्या नालंदास प्रस्थान करणार आहोत. व्यवस्था करा." सम्राटने अश्वावरून उतरताच आदेश दिले

"राजन, युद्धानंतर उद्भवलेल्या परिस्थितीवर चर्चा करणे शेष आहे. हिशेब आणि इतर तत्सम गोष्टींचा विचारविनिमय करायचा आहे. कृपाकरून नालंदा जाण्याचा निर्णय स्थगित करावा." राधागुप्तला सम्राटचा नालंदा जाण्याचा निर्णय मान्य नव्हता.

"या क्षणी माझ्या अशांत मनाला शांत करणे अधिक महत्वाचे आहे. या उद्विग्न  मनस्थितीत कुठलाही निर्णय घेणे योग्य नाही." सम्राट

"महाराणी, तुम्ही तरी समजवून सांगा." अंतरा

"प्रत्येक प्रहर संपतांना या जीवघेण्या वेदना त्यात विरून जातील ही आशा असते. पण नाही अंतरे. त्या अमानुष संहाराची आठवण येताच मला कंप सुटतो. तो मीच होतो..... माझा मला विश्वास बसत नाही. जीव गुदमरतो आहे माझा. प्रत्येक श्वासोच्छ्वासात मला सैन्याचा टाहो ऐकू येतो. महाअमात्य राधागुप्त, आम्हाला प्रस्थान करु द्यावे. कुठलाच निर्णय घेण्याचे सध्या आमच्यात धैर्य नाही." बोलतांना सम्राटच्या डोळयात पाणी तराळले.

"रणभूमीवरील विध्वंसाचे आपण कारण असल्याची ज्या क्षणी त्यांना जाणीव झाली त्या क्षणापासून सम्राट पश्चातापाच्या अग्नीत पोळून निघत आहेत. त्यांना नालंदास प्रस्थान करायला हवे." महाराणी अंतरा आणि राधागुप्तकडे बघत म्हणाल्या

सम्राट अशोक हतबल झालेले बघून राधागुप्त आणि अंतरा व्यथित झाले. त्या क्षणी सम्राट अशोक यांना पाटलीपुत्रास थांबण्याचा आग्रह करणे व्यर्थ आहे हे दोघांच्या लक्षात आले होते.

मध्यान्हीच्या तप्त सूर्याच्या साक्षीने वीरगतीप्राप्त सैनिकांचे अंत्यविधी आटोपले. सर्व परिस्थितीचा आढावा  घेत महाराजांनी मंत्रीपरिषदेला सुचना दिल्या.

"युद्धानंतर उद्भवलेल्या परिस्थितीवर नियंत्रणाचे सुत्र आम्ही तुमच्या सुपूर्त करत आहोत. आपले गुप्तहेर प्रत्येक क्षणाची वार्ता माझ्यापर्यन्त पोहचवतील. काळजी नसावी महाअमात्य. राज्यकारभाराबद्दल मी आश्वस्त आहे. व्यापारासंबधी आणि त्याच्याशी निगडीत निर्णय घेतांना श्रेष्ठी निरंजनाचा सल्ला अवश्य घ्या. मी त्यांना संदेश पाठवला आहे. कौशांबीवरून ते लवकरच पाटलीपुत्रास येतील." सम्राट

"महाअमात्य राधागुप्त आणि अंतरा वसंतऋतु सरल्यावर आपण उज्जयिनीला भेटू." सम्राट

--------०००---------

# अभ्यंतर

## २

वसंतऋतु सरला होता. ग्रीष्माचा दाह चांगलाच वाढला होता. एवढ्या तप्त वातावरणात सम्राट शांत होते. एरवी वैशाखाची चाहूल लागताच महाराजांच्या कक्षेत वाळयाचे पडदे लावण्यात येत असे. आज मात्र या दाहक वातावरणात सम्राट शांतपणे संघप्रमुखाशी चर्चा करत होते. सूर्याच्या सोनेरी किरणांनी सम्राट अशोकचा देह उजळून निघाला होता. तप्त सोनेरी किरणात  सम्राटच्या देहावरून आणि मनातून तामस वितळून गेला होता. चक्रवर्तीचे हे तेज अंतरा कुतुहलाने बघत होती. उज्जयिनीच्या सीमेवर स्थित धर्मशाळेत सम्राट, अंतरा आणि राधागुप्त यांची मंत्रणा सुरु झाली.

"राधागुप्त, यात आचारसंहिता लिहिलेली आहे. याचा राजाज्ञा म्हणून सर्वत्र प्रसार करण्यात यावा." सम्राट राधागुप्त यांच्या हातात एक पटिका देत म्हणाले

"अंतरे, या पटिकेत रज्जुक, समाहर्ता आणि माहामात्र यांच्याविषयी माहिती आहे. यात समस्त अधिकारीवर्गातील सर्वांच्या कार्यभाराचे स्वरुप

व्यापक केले आहे. याचे तंतोतंत पालन व्हावे. आता जंबुद्विपमध्ये धर्मराज्याचा प्रसार व्हावा हेच आमचे प्रायश्चित्त आहे." सम्राट

"आणि हो, महत्वाचे म्हणजे, या पटिकेत मी कलिंगची क्षमा मागितली आहे. याचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हायला हवे." सम्राट पटिका दोघांच्या सुपूर्त करत म्हणाले

"चक्रवर्तींना जर या आज्ञेच्या पालनाने मनस्वास्थ्य लाभणार असेल तर त्याचे पालन तातडीने केले जाईल. यात शंका नको सम्राट." महाअमात्य राधागुप्त

"सम्राट, आपण बौद्धधर्माचा स्विकार केला की काय?" अंतरा

"नाही अंतरे. माझा धर्म तो नीती धर्म, सदाचाराचा धर्म. या पटिकेत प्रजेसाठी आचरण नीती नमुद केली आहे. त्यांचे पालन कसे करावे? याची समस्त माहिती दिली आहे. प्रजेला सर्व नियम पालन करणे बंधनकारक असेल. प्रजेसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे उत्तरदायित्व माझे अर्थात सम्राट अशोकचे आहे." सम्राट

"आम्ही आता फक्त जनकल्याणासाठी कार्यरत असणार आहोत. सर्व नीतींचा, आज्ञांचा, आचारसंहितेचा अवलंब प्रजा काटेकोरपणे करते की नाही हे बघण्यासाठी गुप्तहेर संस्थेची मी स्थापना केली आहे. त्याची प्रमुख तू आहेस अंतरा." सम्राट

राधागुप्त आणि अंतरा आश्चर्याने सम्राटकडे बघत होते.

"महाअमात्य, माझ्या आगमनापर्यन्त साम्राज्याची धुरा तुम्हाला सांभाळायची आहे." सम्राट

"सम्राट, मंत्रीमंडळ आणि समस्त प्रजा आपल्या भेटीस उत्सुक आहेत." महाअमात्य राधागुप्त

"माझ्या अस्तित्वाची जाणीव देणारे या नियमनांचे आपल्या साम्राज्यात सर्वत्र शिलालेख कोरण्यात यावे तसेच दवंडी करावी." सम्राट

"अपल्या आज्ञेचे पालन करण्यात येईल सम्राट" महाअमात्य राधागुप्त

"महाअमात्य, भदन्त आदित्य या पटिकेत नमूद संहितेबद्दल आपल्यासोबत विस्तृत चर्चा करतील." सम्राट अशोक भदन्तकडे बघत म्हणाले

"सम्राट, पाटलीपुत्र येथे पोहताच या सर्व आदेशांचे पालन केले जाईल." महाअमात्य राधागुप्त

"पुढच्या शरद पौर्णिमेस मंत्रीमंडळाची विशेष बैठक बोलवा, आम्ही पाटलीपुत्रास उपस्थित राहू." सम्राट अशोक राधागुप्तला पाटलीपुत्रास येण्याचे आश्वासन देत म्हणाले

"अंतरे, चल. पलीकडच्या कक्षेत माझे काही मित्र तुझी वाट बघत आहे. ते तुझ्या भेटीस उत्सुक आहेत." सम्राट

-----------०००००----------

"सिद्धसेन, ही अंतरा. माझी सखी आणि मुख्यप्रबंधक." सम्राट धर्मशाळेच्या कक्षेत प्रवेश करत म्हणाले

"प्रणाम देवी." सिद्धसेन

"प्रणाम आर्य. आपण?" अंतराने सम्राटकडे विस्मयाने बघत विचारले. सम्राट अशोकच्या आयुष्यातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रसंग तिला ज्ञात होता. हे अगंतुक कोण असावेत? याचा ती विचार करत होती.

"अंतरे, सिद्धसेन संप्रेषण तज्ज्ञ आहे. गुप्तहेर संस्थेसाठी उपयुक्त अशा सांकेतिक भाषेचा ते अभ्यास करत आहे. तू ती आत्मसात करावी आणि त्यांना संशोधनात मदत करावी." सम्राट

"मी महाराज?" अंतरेने आश्चर्याने विचारले

"तुला अनेक उत्तरदायित्वांचे निर्वाह करायचे आहे. जोपर्यन्त माझा हेतू साध्य होत नाही तोपर्यन्त माझे भ्रमण सुरु असेल." सम्राट

"कसला हेतू सम्राट?" अंतराने रागात विचारले

"धीर धर अंतरे. वेळ आल्यावर तुला ज्ञात होईल." सम्राट हसून म्हणाले

"सिद्धसेन, मी प्रातः प्रस्थान करणार आहे. विदीशा येथे ब्रह्मदेशातून आलेल्या एका विशेष अधिकाऱ्याची भेट घेऊन आम्ही कौशांबीला या

पक्षसमाप्तीपर्यन्त पोहचणार आहोत. तोपर्यन्त तुमचा प्रयोग सिद्ध झाला असेल अशी आशा करतो." सम्राट

"देवी अंतरेच्या सह्याने निश्चितच सिद्ध होईल." सिद्धसेन

"अंतरे, तू हे कार्य आटपून पाटलीपुत्रास प्रस्थान कर. तुला वेळोवेळी योग्य ते निर्देश देण्यात येतील." सम्राट

सम्राट अशोकच्या वागण्यातील आणि बोलण्यातील आद्रता अंतरेला जाणवली. कर्णकठोर आणि रुक्षपणे बोलणारे आज किती मृदु भाषेत चर्चा करत होते. बोलण्यात आणि वागण्यातील संयमित आणि प्रसन्न मुद्रा बघून हे नक्की आपले सम्राट आहेत न! तिच्या मनात आले. या विचारात तिने जातांना वळून बघितले तर सम्राट तिच्याकडे बघून हसत होते... तिने हसून पापणी लवली....या निशब्द संवादात तिला जणु सगळचं कळलं होतं.

-------------००००० ------------

महाअमात्य राधागुप्त अस्वस्थ होते. तक्षशिलेवरून ऐनवेळेवर राजन कुणाल यांचा संदेश आला होता. तिथला स्थानिक व्यापारीवर्ग असंतुष्ट होता. कधीही उठाव होण्याची शक्यता होती. त्यामुळे तिथे जाणे अत्यंत आवश्यक होते. शिघ्रातिशिघ्र श्रेष्ठी निरंजनला घेऊन राधागुप्त यांना तक्षशिलेस प्रयाण करायचे होते. मंत्रीपरिषदेची महत्वाची बैठक होती. ती रद्द करणे इष्ट नव्हते. त्यात "तक्षशिलेच्या सीमेवर तिसऱ्या प्रहरी प्रतीक्षा करावी" असा निरोप सम्राटने राधागुप्तास धाडला होता. ते तक्षशिलेस प्रयाण करण्याची मोजक्याच लोकांना ठाऊक असणारी ही वार्ता सम्राटला कशी कळली असणार याचे आश्चर्य करत ते अंतरेस भेटायला गेले.

"महाअमात्य, मंत्रीपरिषदेची बैठक रद्द करायची का?" अंतरा

"अंतरे, बैठक रद्द करु नको. मी तक्षशिलेस प्रस्थान करतो. तशी इतर मंत्रीवरांना सुचना द्या. नगरमहामात्र, धर्ममहामात्र आणि अंतमहामात्र या बैठकीसाठी पाटलीपुत्रास थांबले आहे. " राधागुप्त

"काळजी नसावी महाअमात्य." अंतरा

"उद्या कंबोजवरून महाराजांचे काही अतिथी येणार आहेत. मी त्यांची व्यवस्था केली आहे. तू जातीने लक्ष दे." राधागुप्त

"महाअमात्य, मी सर्व व्यवस्था बघते." अंतरा

"ते कशासाठी येणार आहेत? याची मला कल्पना नाही." राधागुप्तने अंतरेकडे प्रश्नार्थक दृष्टीने बघितले

"ते नक्की कशासाठी येणार हे मलाही ठाऊक नाही." अंतरेने त्यांच्याकडे रोखून बघत उत्तर दिले

"पूर्वी अशा वैयक्तिक भेटींबद्दल मला समस्त माहिती असायची. आता मात्र सम्राट एक कोडं आहे. ते काय करत आहेत? कशासाठी? खरंच उमगत नाही. आपले सम्राट पूर्वीसारखे राहिले नाही." अंतरेच्या आवाजातील खिन्नता राधागुप्तला जाणवली

राधागुप्तला तोच प्रश्न पडला होता. सम्राट नक्की काय लिहित होते? कशासाठी लिहित होते? फार मोठ्या प्रमाणात भुर्जपत्र आणि वनस्पतीपासून शाईची नुकतीच ते व्यवस्था करून आले होते. हे अतिथी कदाचित आत्मचरित्र किंवा युद्धासंबधी लेखन करत असावे असा ते मनोमन अंदाज करत निघाले.

कंबोजवरून पुष्पदंत यांचे पाटलीपुत्रास आगमन झाले होते. त्यांची विषेश अतिथीगृहात सोय करून अंतरा मंत्रीपरिषदेच्या बैठकीस पोहचली. सम्राट अशोकच्या आदेशानुसार या बैठकित महत्वाचे निर्णय घेण्यात आले. महामात्रांच्या समस्या सोडवण्यात आल्या. त्यांना सर्व राज्यात विना अनुमतीपत्र भ्रमंतीची संमती देण्यात आली. राज्यातील इतर तक्रारींचे निवारण करण्यात आले. सम्राटच्या आज्ञेनुसार प्रजेसाठी करण्यात येणाऱ्या सुविधांवर चर्चा झाली. अतिरिक्त पाण्याच्या साठ्यासाठी तरतूद करून, आहे त्या साठ्यांची डागडुजी तसेच विपत्तीकाळासाठी धनधान्यसंचय यावर विचारविनिमय करण्यात आला. मंत्रीपरिषदेच्या या बैठकीचा आणि कोषागराचा अहवाल अंतरेस सम्राटपर्यन्त पोहचवायचा होता. समाहर्तांतर्गत येणाऱ्या सर्व अध्यक्षांच्या बैठकीची व्यवस्था करायची होती. शुल्काध्यक्ष, पौतवाध्यक्ष, मानाध्यक्ष, सूत्राध्यक्ष, सीताध्यक्ष, सुराध्यक्ष, गणिकाध्यक्ष, मुद्राध्यक्ष, विवीताध्यक्ष, नावाध्यक्ष, गो-अध्यक्ष, अश्वाध्यक्ष, हस्त्याध्यक्ष, कुप्याध्यक्ष, पण्याध्यक्षा, लक्षणाध्यक्ष, आकराध्यक्ष, देवताध्यक्ष, सौवर्णिक या सर्वांकडून आर्थिकनियोजनाच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी संदेश पाठवायचा होता. सन्निधात्यांकडून व्ययशेष आणि अधिशेषाची माहिती, तसेच कोषागृहातील विविध रत्ने, आभुषण, आणि मौल्यवान वस्तुंचे वार्षिक मुल्यांकन सम्राट अशोकपर्यन्त पोहचवायचे होते.

करव्यवस्था, क्रय-विक्रय आणि परराष्ट्र व्यापारातून उत्पन्न यावर महाअमात्यांचे लक्ष होते. या संदर्भातील अहवाल ते स्वतः सम्राटपर्यन्त

पोहचवत असे. मुख्यप्रबंधक या नात्याने  केंद्रशासनव्यवस्थेतील प्रत्येक अहवाल सम्राटपर्यन्त पोहचवण्याची व्यवस्था अंतरेकडे होती. सम्राटच्या अनुपस्थितीत संपूर्ण राज्यकारभार मग ती प्रांतिक असो वा ग्रामीण, महाअमात्य आणि अंतरा परिषदेतील मोजक्या विश्वस्तांच्या साह्याने नियंत्रित करत होते.

अंतरेच्या उत्तरदायित्वाचा परीघ दिवसनदिवस वाढत होता. सम्राटच्या विश्वस्तांपैकी ती एक होती. लहानपणापासून असलेली सखी आज सम्राट अशोकची मुख्यप्रबंधक होती. आता हे नवीन उत्तरदायित्व. सिद्धसेनसोबत कार्य सुरु होतेच आता पुष्पदंतच्या कार्यासाठी सामग्री उपलब्ध करून द्यायची आहे. ते काय प्रयोग आहेत? त्याने काय साध्य होणार? या विचारात बैठक आटपून ती  पुष्पदंतकडे निघाली.

"आर्य, ही सर्व सामग्री उपलब्ध करून देण्यास थोडा अवधी लागेल. मी व्यवस्था करते." अंतरा पुष्पदंतने लिहून दिलेली सूची वाचत म्हणाली

"हो, मी प्रयोगाच्या तयारीस लागतो. मला लेखनासाठी शाई आणि भुर्जपत्र हवे आहेत." पुष्पदंत

"सर्व सामग्री मिळाल्यावर मला प्रयोगासाठी एकांत जागा मिळाली तर...." पुष्पदंत

"आर्य, तुम्ही म्हणाल तिथे व्यवस्था करून देण्यात येईल." अंतरा टाळया वाजवत म्हणाली

टाळयांचे संकेत ऐकून दोन सैनिक आत आलेत.

"आर्य, हे मेघनाद आणि चंद्रकेतू आहेत. माझे विश्वस्त. आता हे तुमच्या सेवेत असतील." अंतरा

"मेघनाद, आर्य पुष्पदंत जे म्हणतील ती व्यवस्था करून देण्यात यावी." अंतरा

-----------0000-------------

अंतरेचे सिद्धसेनसह सांकेतिक लिपीवर कार्य वेगाने सुरु होते. या संकेतामुळे संदेशाची देवाण घेवाण अचूक होणार होती. परवलीच्या शब्दाशिवाय संदेशवाहकाच्या संदेशाला काहीच अर्थ नव्हता. या साठी प्रशिक्षणाची तिला व्यवस्था करायची होती. परराष्ट्रात आणि परकीय प्रांतात व्यापार करतांना त्या भागातील स्वकियांना शोधण्यासाठी संदेशाच्या एका विशिष्ट पद्धतीची योजना करण्यात यावी अशी सम्राटची इच्छा होती. सिद्धसेन आणि ती  नव्या संप्रेषण पद्धतीवर काम सुरु करणार होते.

एक महत्वाचा प्रयोग सिद्ध झाला म्हणून अंतरा सिद्धसेनसह पुष्पदंतला भेटायला निघाली. प्रयोगासाठी त्याने एक निर्जन जागा निवडली होती.  पुष्पदंतने त्याच्या प्रयोगासंबधी दिलेली माहिती अचंभित करणारी होती. या प्रयोगामुळे अतिसंवेदनशील गुप्तसंदेश धातूच्या वस्तुमार्फत पोहचवून तो सहजरित्या नष्ट करता येणार होता. तो प्रयोग सांकेतिक भाषेत लिहून घ्यायचा होता. हे सर्व प्रयोग, मोठ्या प्रमाणात तयार करण्यात येणारे भुर्जपत्र आणि शाई, सम्राट नक्की कशासाठी हे सर्व लिहून घेत आहे? तिला उमगत नव्हते.

या विचारात मग्न असलेली अंतरा दौवारिकास सुचना देऊन अंतःपुरातील संरक्षण विभागाकडे निघाली. संदेशवाहकांच्या पाक्षिक

नियोजनाकडे दृष्टीक्षेप टाकता तिला काही महत्वाचे बदल लक्षात आले. महाअमात्यांशी चर्चाकरून मग सम्राटांना कळवावे असा तिचा मानस होता. दोन प्रहारानंतर पक्षसमाप्ती होणार होती. सूर्यास्तापर्यन्त महाअमात्य राधागुप्त पाटलीपुत्रास परतणार होते.

--------------*****-------------

"महाअमात्यांचे पाटलीपुत्रास आगमन झाले आहे देवी. ते संध्या आटपून ग्रंथालयात आपली प्रतीक्षा करतील." मेघनाद

"इथले कार्य आटपून आम्ही ग्रंथालयाकडे प्रस्थान करु." अंतरा

"आनंदी, सुरक्षिततेच्या दृष्टीने स्नानगृह आणि पाकघरातील मागचे प्रवेशद्वार पुढच्या चार पौर्णिमेपर्यन्त बंद ठेवण्याचे आदेश देण्यात येत आहेत. राजपरिवारासाठी पूर्वेकडील द्वार आणि सेवकांसाठी पश्चिमेकडील द्वार उघडण्यात यावे." अंतरा

"जशी आज्ञा देवी." आनंदी

"आणि हो आनंदी, यापुढे महालातील स्नानगृह, पाकघर, भोजनकक्ष, शयनकक्ष, महालातील उपवन आणि राजपरिवारातील आभुषण, वस्त्र या विभागांचा कार्यभार तुझ्या देखरेखीखाली असणार आहे. सर्वांचा पाक्षिक अहवाल माझ्यापर्यन्त वेळेत पोहचला पाहिजे." सुचना देत अंतरा ग्रंथालयाकडे निघाली.

"महाअमात्य, मंत्रीपरिषदेतील बैठकीत घेण्यात आलेले निर्णय आणि इतर तपशील तुम्हाला अमात्य देतील." अंतरा

"हो. मी आज कोषाघरात जाणार आहे. तक्षशिलेतील परिस्थिती आता नियंत्रणात असली तरी काही काळ आपले युक्त तिथे नेमून आलो आहे.

त्या अधिकाऱ्यांचे प्रत्येकी प्रतिमाह ४५०पण आपल्या कोषाघरातून देण्याची ही राजाज्ञेची प्रत कोषाध्यक्षांच्या सुपूर्त करायची आहे." राधागुप्त

"अंतरे, तक्षशिलेच्या सीमेवर सम्राटची भेट झाली. ते सुराष्ट्रचे राज्यपाल तुषास्फ यांच्या भेटीस प्रस्थान करणार होते. त्यांनी हा संदेश तुझ्यासाठी दिला आहे. " राधागुप्त संदेश देत म्हणाले

"महाअमात्य, सम्राटचे निर्देश आहेत. मला सुवर्णगिरीला तातडीने पोहचायचे आहे." अंतरा संदेश वाचत म्हणाली

"प्रतिवेदिका आनंदी यांना बोलवणे पाठवा." अंतराने सेवकास सांगितले

"आनंदी, मध्यान्ही सुवर्णगिरीस प्रस्थान करायचे आहे. व्यवस्था करण्यात यावी." अंतरा

"देवी, सुवर्णगिरी येथे एक श्रमण आपली प्रतीक्षा करत आहेत." महाअमात्य राधागुप्त

"सिद्धसेन...पुष्पदंत आता हे श्रमण......" अंतरा संदेशाअंती गोपनीयतेचे चिन्ह बघत मनात म्हणाली

"हो देवी, तुमच्या या भेटीबद्दल कुठलीही वार्ता करु नये. सम्राटचे आदेश आहे." राधागुप्त

नक्की काय चाललं आहे? काय कार्य सुरु आहे? तिला अंदाज येत नव्हता. एकेकाळी सम्राट अशोकच्या आयुष्यातील सर्व घटना आणि व्यक्ती फक्त तिला ज्ञात असे. आता मात्र किती अगंतुकांना भेटण्याचे प्रयोजन सम्राट करणार आहेत? आता हे श्रमण कोण? या विचारात अंतरा महालातून बाहेर पडली

------------०००-----------

# अभ्यंतर

## ३

पुष्पदंत आणि सिद्धसेनने दिलेले भुर्जपत्र घेऊन अंतरा सुवर्णगिरीला निघाली. प्रवास तसा दूरचा होता. आता तिला सिद्धसेन आणि पुष्पदंतच्या प्रयोगांबद्दल विचार करायला वेळ मिळाला होता. तिला सिद्धसेनची संप्रेःषण यंत्रणा अतिशय आवडली होती. मात्र पुष्पदंतचे धातुवर होत असलेले प्रयोग तिच्या जाणीवकक्षेच्या पलीकडचे होते. सिद्धसेन आणि पुष्पदंत यांचा या भुर्जपत्रातील माहिती त्या श्रमणांपर्यन्त पोहचवण्याचा काय हेतू असेल? ते एकमेकांना परिचित कसे आहेत? ते प्रयोग बघून तिच्या मनात विचार आला. कालप्रवाहात जर या पटांनी तग धरली तर हजारों वर्षांनंतर मानवाला मौर्यसाम्राज्याबद्दल निश्चितच माहिती उपलब्ध होईल. परंतु हे सर्व कशासाठी? सम्राट अशोक यांना भेटून तिला अनेक प्रश्न विचारायचे होते. आदेश...आदेश आणि आदेशांचे पालन करून ती त्रस्त झाली होती. तिच्यासाठी आदेशांचे पालन करणे त्रासदायक नव्हते. तो तर तिचा धर्म होता. त्या कार्याचे, त्याचे प्रयोजन माहिती नसून त्या आदेशांचे पालन करावे लागत होते, हे तिच्यासाठी जीवघेणे होते.

दक्षिणेकडे अंतराने फार प्रवास केला नव्हता. सुवर्णगिरी अतिशय रम्य आणि सम्राटची आवडती नगरी होती. ते नेहमी ब्रह्मगिरी, इशिला आणि सुवर्णगिरीच्या निसर्गसौंदर्याबद्दल भरभरून बोलत असे. आज ती प्रत्यक्ष त्याचा आनंद घेत होती.

नियोजित स्थळी पोहचेपर्यंत तिला भेटीचे प्रयोजन सेवकाने कथन केले होते. ठरल्याप्रमाणे नगरच्या बाहेर एका वाटिकेत ती पोहचली. महापद्म, साधकाचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. ते तेज बघून अंतराने मानवंदना केली.

"स्वागत आहे देवी. आपणास प्रवासात कष्ट झाले असेल तर आधी विश्रांती घ्या. मग चर्चा करु" महापद्म

"बारा प्रहरांच्या या प्रवासात शीण आला नाही. अतिशय रम्य आहे हा भाग." अंतरा

"इतक्यात अग्नीवेश येईल. मग आपण चर्चेस प्रारंभ करु. तोवर आपण जलपान करून घ्यावे." महापद्म

"अग्नीवेश? " अंतरेने उत्सुकतेने विचारले

"हो, त्यांचे आगमन झाल्यावर आपण चर्चा आरंभ करु." महापद्म

तेवढ्यात अग्नीवेश यांचे आगमन झाले. अग्नीवेश, नावाप्रमाणे व्यक्तिमत्व होतं. तेजोमय चेहरा आणि विलक्षण प्रतिभावान. त्यांना बघताच अंतरा मानवंदनेस उठली.

"देवी, आपल्याला कल्पना नसेल म्हणून सांगतो. आपण एका प्रच्छिन्न समितीचे सदस्य आहोत." महापद्म

"धर्मपाल यांनी या समितीची निर्मिती केली आहे." अग्नीवेश आसनस्थ होत म्हणाले

"धर्मपाल?" अंतराने आश्चर्याने विचारले

"धर्मपाल अर्थात सम्राट अशोक. ते धर्मप्रचारक आणि प्रसारक आहेत. त्यांचे कार्य लक्षात घेता आम्ही चक्रवर्तींना "धर्मपाल" संबोधन दिले आहे." महापद्म

"प्रच्छिन्न समिती? या समितीचे उद्दिष्ट्य काय? नक्की काय संकल्पना आहे?" अंतरेच्या शब्दातील रोध सर्वांना जाणवला. इतक्या घडामोडी झाल्या आणि सम्राट आपल्याशी अक्षरही बोलले नाहीत याची तिला खंत वाटत होती.

"देवी, या सर्वांवर चर्चा करायला आपण एकत्र आलो आहोत. हे सर्व पाटलीपुत्रास करणे शक्य नव्हते. आपण सर्वांनी एकत्रित येऊन बोलणे आणि कार्य करणे धोक्याचे आहे." अग्नीवेश

"हो देवी. गोपनीयता अत्यंत महत्वाची आहे." महापद्म

"या समितीत अजून कोण कोण आहे?" अंतरा

सम्राटने या भेटीची गुप्तता ठेवण्याचा आग्रह का केला याचे कारण आता अंतराला उमगत होते.

"आम्ही नऊ लोकं आणि आमच्या नऊजणांच्या संवादाचे तुम्ही माध्यम असणार आहात." महापद्म

"म्हणजे सिद्धसेन आणि पुष्पदंत हे या समितीचे सदस्य आहेत?" अंतरा

"हो, त्यांचे प्रयोग यशस्वी झाल्यावर आम्ही आमच्या क्षेत्रातील संशोधनासाठी निघून जाऊ." अग्नीवेश

"मी महापद्म, श्रमण आणि एक संशोधक आहे. माझा आणि सम्राटचा परिचय संघाच्या एका बैठकीत झाला. आमच्यासाठी पिण्याचे जे पाणी उपलब्ध केले जात होते, ते पिण्यास अयोग्य होते. मी काही वनस्पती आणि औषधांच्या माध्यमातून ते पिण्यास योग्य केले. असे अनेक संशोधन मी

सम्राटपुढे मांडले. नंतर आमच्या अनेक चर्चा झाल्यात. धर्मपाल यांनी केलेल्या आर्थिक सह्याने मला अधिक संशोधन करता आले." महापद्म

"हे प्रयोग करतांना लक्षात आले, काही सुक्ष्मजीव आणि विषाणूंच्या माध्यमातून फार मोठी जिवीतहानी होऊ शकते. या जैविकरोगांचा प्रसार अत्यंत वेगाने होतो. हे संशोधन उपद्रवींच्या हाती लागू नये म्हणून सर्व संशोधन गुप्तपणे करायचे आहे." महापद्म

"माझे कार्य अवकाशातील ग्रहताऱ्यांसबधित आहे. हे दूरवरचे ग्रह आणि आपल्यामधे एक गुरुशक्ती असते, त्यात जर व्यत्यय आणला तर अनेक आश्चर्यचकित घटनांचा शोध शक्य आहे." अग्नीवेश

"अवकाशातील ग्रहांची दिशा, त्यांच्यामधील अंतर, सूर्यचंद्राचे ग्रहण, असे अनेक शोध सुरु आहेत. आपल्या वेद आणि शास्त्रात ही समस्त माहिती दडलेली आहे. मी सध्या प्रकाशाची गती आणि त्या गतीवर नियंत्रण यावर संशोधन करत आहे. या माहितीचा उपयोग जनकल्याणासाठी व्हावा. त्याचा दुरुपयोग होऊ नये म्हणून हे सर्व संशोधन गुप्त असणार आहे. ही माहिती एका विशिष्ट लिपीत अंकित करून ठेवायची आहे. त्या लिपीचा शोध सिद्धसेनने लावला आहे आणि ती तुम्हाला ज्ञात आहे देवी." अग्नीवेश

"पुष्पदंत हे स्थायुर्विद्येचे प्रणेते आहेत. स्थायुर्विद्या अर्थात विविध धातू व त्यांवर रासायनिक प्रक्रियेतून अनेक नवीन धातू आणि उपयुक्त वस्तुंचा शोध पुष्पदंतने सिद्धीस नेला आहे. काही विशेष संशोधनासाठी ते पाटलीपुत्रास व्यस्त आहेत. त्यांनी आपल्याजवळ आमच्यासाठी काही निर्देश दिले आहेत देवी." महापद्म

"हो. " पुष्पदंत आणि सिद्धसेनने दिलेले भुर्जपत्र त्यांना देत ती म्हणाली

"आपण अस्वस्थ आहात देवी?" अग्नीवेश

"नाही. आर्य, तुम्ही नऊजणांबद्दल बोलत होता. सध्या मला चारजणांबद्दल माहिती आहे. हे पाच कोण? माझी त्यांची भेट कशी होणार?" अंतरा

"पाचपैकी एक व्यक्ती तुमच्या सतत बरोबर असते देवी." अग्नीवेश स्मितहास्य करत म्हणाले

"कोण?" अंतराने सोबत असणाऱ्या व्यक्तीबद्दल आठवायचा प्रयत्न करत विचारले

"आपला विश्वस्त आणि प्रतिवेदक मेघनाद" महापद्म

"मेघनाद? तो नेहमी एका विशिष्ट कलेबद्दल बोलत असतो. ताम्रपणीच्या वास्तव्यात त्याने ती आत्मसात केली होती. आमची थोडीफार

चर्चा झाली होती. त्यावर तो संशोधन करत असेल मला कदापि वाटले नाही" ऐकून अंतराला आश्चर्याचा धक्का बसला होता

"आणि ते चौघं कोण? " अंतराची उत्सुकता ताणली गेली होती

"शंखपाल, हे मनोशास्त्राचे व्यापार जाणतात, संमोहन शास्त्रात ते पारंगत आहेत. विरुपाक्ष, हे गुरुत्वशक्तीवर शोधन करत आहेत, विमानकलेवर त्यांचा अभ्यास दांडगा आहे. ऋष्यश्रींग, हे सर्ववेदपारंगत आणि सर्व शास्त्रांचे ज्ञाते, या विश्वाच्या उत्पत्तीवर शोधन करत आहेत. धर्मपाल अर्थात स्वतः सम्राट अशोक हे समाजशास्त्राचा अभ्यास करत आहेत. सर्व धर्माज्ञा आणि आचरणसंहिता, तुम्ही शिलाफलक, शिलालेख, स्तंभलेखांच्यास्वरुपात सर्वत्र प्रसार करत आहात, तो त्याचाच एक भाग आहे. संपूर्ण समाजाला एकसुत्रात बांधण्याची त्यांची ही विलक्षण संकल्पना आहे." महापद्म

"हे संशोधन सिद्ध करून याचे प्रमाण ग्रंथरुपात अंकितकरून जतन करायचे आहे. जेणेकरून येणाऱ्या पिढीस ते मार्गदर्शक ठरेल. मात्र ही माहिती उपद्रवींपासून जतन करण्याचे उत्तरदायित्व तुमचे आहे देवी." अग्नीवेश

"आपण सिद्धसेनच्या संप्रेषण पद्धतीद्वारे एकमेकांच्या संपर्कात राहू. तो फार मोठे संपर्काचे जाळे तयार करत आहे. कोळिष्टक असते तसे. हे सर्व संशोधन संकलित करून जतन करण्याचे उत्तरदायित्व तुमचे आहे अंतरा." महापद्म

"मी एकटी ! हे सर्व कसे शक्य आहे आर्य? अंतरा

"तुमच्यासोबत आनंदी आहे. आमचे काही विश्वस्त तुमच्या संपर्कात असतील." अग्नीवेश

"आपण विश्रांती घ्यावी देवी. उद्या प्रातःसमयीपर्यन्त सर्वांचे आगमन झाले असेल. उद्या महत्वाची बैठक आहे." महापद्म

या भेटीचे प्रयोजन लक्षात येताच अंतरा आश्चर्यचकित झाली होती. सम्राट अशी काही योजना करतील तिने कधी कल्पना केली नव्हती. लहानपणापासून ते आजपर्यन्त तिने सम्राट अशोकच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यात त्यांचे विविध रुपं बघितले होते. धर्मा राणीच्या या लाडक्या पुत्रासोबत ती लहानपणी खेळली होती. अतिशय हट्टी आणि अन्यायाविरुद्ध संतापाने तापणारा लहानपणीचा तो अशोक सर्वत्र आपले वर्चस्व सिद्ध करण्यात तरबेज होता. प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करणारा, युद्धकलेत निष्णांत, अतिचपळ कुमार अशोक, तारुण्यातील मदमस्त, उद्दाम आणि उन्मत राजकुमार अशोक, स्वतःच्या सामर्थ्याची प्रचिती नेमकी कुणाला द्यावी हे कमी वयात जाणणाऱ्या राजकुमार अशोकने आपल्या सामर्थ्याची मौर्य साम्राज्याचे विश्वस्त आणि शुभचिंतकांना प्रचिती देऊन मौर्यसाम्राज्याचा योग्य उत्तराधिकारी असण्याचा विश्वास प्राप्त केला होता. साम्राज्याची धुरा हाती येताच राजन अशोकने साम्राज्य विस्ताराची

महत्वाकांक्षा पूर्ण केली. आयुष्याच्या या टप्प्यात सम्राट अशोकचे चंड रुप बघून ती भयभीत झाली होती.

देवी-पद्मा-तिष्यरक्षा या राण्या असल्या तरी त्यांचे ते प्रियकर कधीच नव्हते. कालांतराने महाराणी देवीच्या लाघवी स्वभावाला ते भुलले असले तरी ते फक्त त्यांच्या सहवासापुरते मर्यादित होते. पिता झाल्यावर त्या पाषाण हृदयाला मायेचा पाझर फुटला होता. आयुष्याच्या या प्रवासात सम्राट अशोकने मात्र त्यांच्या मैत्रीत स्वतःची गडद आणि गूढ बाजू अंतरेपासून कधीच लपवली नव्हती. त्यांच्या या अनामिक नात्यात दोघे एकमेकांशी कायम प्रामाणिक होते. आनंदीने एकदा गमतीने तिला विचारले होते...सम्राटवर प्रेम तर करत नाही ना? हो तर...प्रेम आहे...आकर्षण आहे.....एकमेकांची काळजी आहे...विश्वास आहे..आदर आहे.. जे काही आहे ते नात्यात बंदिस्त करण्यासारखे कधीच नव्हते....

आज मात्र सम्राट अशोकचे हे रुप तिला नवखे होते. तिला हे आवडले होते....कदाचित याच सम्राट अशोकची ती मनोमन कल्पना करत होती.

"देवी, आपण पाटलीपुत्रास पोहचल्यावर या बैठकीचे तपशील पुष्पदंत आणि सिद्धसेन या दोघांना द्यावेत." अग्नीवेश तिचे मनन भंग करत म्हणाले

"महाअमात्य राधागुप्त यांची या कार्यात महत्वाची भुमिका आहे. अखंड भारताच्या व्यवस्थापनाचे कार्य त्यांना पार पाडायचे आहे. देवी, याबद्दल कल्पना असली तरी त्यांना विश्वासात घेऊन ही संकल्पना तुम्ही सांगणार आहात." महापद्म

"हो." अंतरेच्या डोळयात एक आश्वस्त चमक दोघांना दिसली

अंतराच्या मनातून सम्राट अशोकविषयी असलेले किल्मिष क्षणात विरून गेले होते. चक्रवर्ती अशोक अर्थात धर्मपालचा तिच्यावर असलेला विश्वास तिला महत्वाचा होता. अत्यंत विशाल आणि व्यापक योजनेत ती महत्वाची भुमिका साकारणार होती. तिला मागच्या भेटीतले सम्राटचे शब्द आठवत होते. ती योग्य वेळ आली होती. सम्राटचा हेतू धर्मरक्षणासाठी आणि समस्त जनकल्याणासाठी होता.

अल्पोपहार घेऊन प्रच्छिन्न समितीची बैठक आरंभ झाली. नऊ सदस्य- नऊ ग्रंथांची निर्मिती आरंभ करणार होते. आखणी झाली. विषयाची व्याप्ती- मांडणी- प्रयोग- सर्व दृष्टीकोनातून सर्व ग्रंथावर चर्चा झाली. ग्रंथविस्ताराबद्दल धर्मपाल संकेत देणार होते. तोपर्यन्त सर्व आपल्या कर्तव्याचे निर्वाह करणार होते. अंतरा सर्वांच्या संपर्कात रहाणार होती. त्यांच्या संशोधनासाठी आवश्यक ते साह्य ती उपलब्ध करून देणार होती. या प्रयोगाचे

कार्यक्षेत्र अत्यंत विशाल होते. या ज्ञानकोशात प्रत्येक सुक्ष्म गोष्टींचा विचार महत्वाचा होता. सर्वांचे पहिले प्रयोग यशस्वी झाल्यावर ग्रंथलेखनास आरंभ होणार होता. ग्रंथाचा पहिला आराखडा तयार झाल्यावर त्यांच्या पुढच्या भेटीचे संकेत अशोकराम येथिल बौद्धसंगितीत मिळणार होते.

-----------० ० ० ०----------

पाटलीपुत्रास आल्यावर ठरल्याप्रमाणे अंतराने पुष्पदंत, सिद्धसेन तसेच राधागुप्त यांना सुवर्णगिरी येथील चर्चा आणि पुढील कार्यनीती कथन केली. जनकल्याण आणि धर्मरक्षणासाठी महाअमात्य राधागुप्त यांचा सहभाग महत्वाचा होता. सम्राट अशोकच्या व्यस्ततेमुळे अखंड भारतातील समस्त व्यवस्था आणि नियंत्रणाचे उत्तरदायित्व त्यांचे होते. सम्राटचे धर्मपाल हे नाव या समितीतील सदस्य आणि कार्यवाहकांपर्यन्त सीमित होते. अंतरा राज्यकारभार आटोपल्यावर तिचा तिसरा प्रहर या महत्वाच्या कार्यासाठी देत होती. सर्व काही ठरल्याप्रमाणे होत होते. ग्रंथ निर्मितीच्या प्रक्रियेत गुप्तलिपीतील संस्करणाचे कार्य ती स्वतः लक्षपूर्वक करत होती.

मंत्रीमंडळाच्या विशेष बैठकीसाठी सम्राटचे पाटलीपुत्रास आगमन झाले होते. त्यांचे अल्पकाळासाठी वास्तव्य असले तरी त्यांनी बैठकीनंतर अंतरेसोबत मंत्रणेसाठी वेळ काढला होता.

"बोल अंतरे. आज तुझ्या सगळया प्रश्नांची उत्तर मी देणार." सम्राट अशोक

"मला पडलेल्या प्रश्नांबद्दल तुम्हाला माहित होते तर?" अंतरा

"मला नाही तर कोणाला माहित असणार सखे! खरं सांगू? विश्वास होता माझ्या ध्येयाची आणि माझ्या वचनांची तू पूर्तता करशील." सम्राट अशोक

"अर्थात. मला विश्वास होता की तुम्ही माझ्याकडून जे कार्य करून घेत आहात त्याचा हेतू उदात्त आहे. मी भाग्यवान आहे. तुम्ही माझी या कार्यासाठी निवड केली." अंतरा

"अंतरे, खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा आचार्य चाणक्य यांचा संदेश आला होता. त्यांचे स्वास्थ्य ठीक नव्हते. पिताश्रींसोबत त्यांच्या भेटीस गेलो होतो. त्यांच्या संवादाने मला आकर्षित केले. सोळा प्रहरातील त्या वास्तव्यात माझ्या बालमनावर त्यांची काही वाक्य कोरली गेली ती कायमची. कदाचित माझ्या महत्वाकांक्षेने त्या क्षणी आकार घेण्यास आरंभ केला असावा. या आकांक्षेला जोड मिळाली ती पितामहांच्या अर्थात चंद्रगुप्त मौर्य यांच्या कथांची, ते श्रवण करतांना माझ्यातील रक्त उसळत असे.

अंतरे, चक्रवर्तीचे ध्येय मी तेव्हाच ठरवले होते. आचार्य चाणक्य यांच्या मृत्युपश्चात मी त्यांनी रचलेल्या कूटनीतीचा अभ्यास केला. कौटिल्यनीतीवर आधारित साम्राज्याच्या धोरणांमध्ये आवश्यक ते बदल केले. साम्राज्य समुद्रपर्यन्त विस्तारित केले. या विस्तीर्ण साम्राज्याला निश्चित दिशा आणि स्वरुप देणे आवश्यक होते. कलिंगयुद्धानंतर मला लक्षात आले, माझे

ध्येय चक्रवर्तीचे होते आणि आचार्य चाणक्य यांचे ध्येय अखंड भारताचे होते. मला आता अखंड भारताचे स्वप्न साकार करायचे होते. या विस्तीर्ण साम्राज्याला एकसुत्रात बांधणे किती कठीण आहे हे मला तिस्सशी वार्तालाप करतांना उमगले. या अखंड भारतातील विविधतेत मला एकात्मता आणायची होती, विविध धर्मीयांच्या लोकांना इतर धर्माचे महत्व पटवून द्यायचे होते. नको असलेल्या रुढी परंपरा यात जखडलेल्या लोकांना धर्माचा खरा अर्थ समजवून सांगायचा होता. "सर्वधर्म एकसमयावच्छेद" साधणे एक संघर्ष आहे. अनादी काळापासून प्रस्थापित धर्मव्यवस्था बदलणे कठीण असले तरी असंभव नाही. या संभावनेसाठी पाटलीपुत्रमधून मी प्रस्थान केले होते. तेव्हा माझ्यासमोर हे एकच ध्येय होते. मात्र या प्रवासात ज्ञानाच्या शोधात असलेल्या काही अभ्यासकांची भेट झाली. त्या क्षणी माझ्या ध्येयाला व्यापक स्वरुप प्राप्त झाले. वेदव्यासांनी जसे वेदाचे चार भाग केलेत, मी या ज्ञानाचे नऊ भाग केलेत. कदाचित कालचक्रात या विषयांची व्याप्ती द्विगुणीत होईल."
सम्राट अशोक

"सम्राट, या महान कार्यासाठी माझे सर्वस्व अर्पण आहे. मी एका दासीची कन्या आहे...आपण...." बोलतांना अंतराचा स्वर भरून आला

"अंतरे, तुझी आई माझ्या आईची सखी आणि तू माझी सखी. दास्यत्व आपल्या मैत्रीआड कधीच आले नाही आणि येणार नाही. मी न सांगताच तुला उमगतं... एक तूच आहे माझे अंतर्बाह्य रुप जाणणारी. खरा-खोटा मी जसा

आहे...तुला मान्य आहे. तुला माझा  कधी राग येत नाही?" सम्राट तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेने बघत म्हणाले

"सम्राट, चौथा प्रहर आरंभ होईल, विश्रांती घ्यावी." अंतरा मंद हसत म्हणाली

"आता विश्रांती नाही अंतरे. ध्येयपूर्तीनंतर हा देह श्रांत होणार. खूप काही साध्य करायचे आहे." सम्राट अशोक

आकाशात विखुरलेले शरदाचे चांदणे ब्रह्मप्रहराची चाहूल लागताच मिणमिणायला लागले. भिरभिरणाऱ्या गाराव्याने अंतरेचे अंग शहारले. अनामिक जाणीवेने अंतरा भारावून गेली होती. ही जाणीव होती समर्पणाची...समर्पण....एका महान कार्यासाठी.

सम्राट अशोकच्या अथक प्रयत्नांनी समाजव्यवस्थेत अमुलाग्र बदल झालेत. समाजातील सर्व स्तरांवरील प्रजेसाठी सर्वत्र अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. मनोरंजनाचे साधन, क्रिडा, कला, साहित्य यांना प्रोत्साहन देण्यात आले. सूत्रवाङ्मय, महाकाव्य- रामायण, महाभारत, व्याकरणग्रंथ यावर लेखन करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. स्वदेशी आणि विदेशी व्यापार वाढीस लागले.

सम्राट अशोकच्या नेतृत्वांतर्गत न्यायव्यवस्थेकडे विशेष लक्ष देण्यात आले. तक्षशिला, कंधार, नालंदा, विक्रमशिला येथे स्थित विश्वविद्यालयांकडे विशेष लक्ष देण्यात आले. ज्ञानाचा सर्वत्र प्रसार करण्यात आला. सर्वत्र निर्पेक्ष धर्मव्यवस्था, सुख, शांति, सहिष्णुता आणि अंहिसा नांदावी यासाठी सम्राट प्रयत्नशील होते. सम्राट अशोकच्या धर्मसंकल्पनेतील राज्य  आकार घेण्यास सुरवात झाली होती. समृद्ध भाषा, आदर्श संस्कृती, आदर्श परंपरेची बीजे जनमानसात अंकुरीत होते.

तिसऱ्या बौद्धसंगितीमध्ये प्रच्छिन्न समितीच्या भेटीचे संकेत मिळालेत. नालंदाच्या विश्वविद्यालयात पुढची भेट ठरली. सर्व ग्रंथाच्या संशोधनावर विचार करण्यात आला. पुढचे टप्पे ठरविण्यात आले. पुढच्या भेटीचे संकेत मिळेपर्यन्त परत जो तो आपआपल्या संशोधनात व्यस्त झाला. अंतरा, सर्वांच्या कार्यावर लक्ष ठेऊन होती. नऊ जणांपैकी ज्यांना ज्या साह्याची आवश्यकता असेल, ती कार्यवाहकांच्या मदतीने पूर्ण करत होती.

एकदा सम्राट पाटलीपुत्रास आले असता अंतराने तिच्या मनातील शंका विचारली.

"सम्राट, आपल्यानंतर या ज्ञानकोशाची गुप्तता अबाधित रहाणार ना?" अंतराने काळजीच्या स्वरात विचारले

"हो अंतरे. या ध्येयपूर्तीसाठी प्रत्येक व्यक्ती मी पारखून घेतली आहे. प्रत्येक व्यक्ती त्याच्या विषयात पारंगत तर आहेतच राष्ट्रप्रेमाने ते ओतप्रोत भरलेले आहेत. समाजाच्या उत्थानासाठी अशाच विशेषव्यक्तींची आवश्यकता असते अंतरे. हे विशेषव्यक्ती प्रशिक्षणांनी सिद्ध आहेत. माझा अनुभव सांगतो आपल्या या ग्रंथनिर्मितीत कसलेही व्यत्यय येणार नाही. मानवाचा स्वभाव आणि मनोव्यापार मी जाणतो अंतरे. मानव हाच मानवाच्या विनाशाचे कारण ठरु शकतो. मी आणि माझे साम्राज्य कधीतरी अस्त होणार हे मला ज्ञात आहे. निसर्ग आजवर देत आला आहे आणि अनंत काळापर्यन्त मानवाला देत राहिल. सृष्टीतील हे ज्ञान अबाधित रहावे म्हणून तर हा सगळा प्रयत्न अंतरे.

मानवातील कुतुहल कमी अधिक प्रमाणात सतत जागृत असते. अज्ञाताचा शोध घेणे, ज्ञानाची तृष्णा शमवणे आणि उपभोग घेणे हा मानवाचा स्वभावधर्म आहे. जेव्हा मानवाला एखाद्या चमत्काराची आवश्यकता असेल, तेव्हा हे ज्ञान मानवाला उपयुक्त ठरेल आणि त्याचे जीवन अधिकाधिक समृद्ध होईल. हे अभ्यंतर आहे. शतकांनंतर एक काळ असा येईल मानव परिपूर्ण असेल, समृद्ध असेल. मग आरंभ होईल नव्या युगाचा, या युगाच्या विस्ताराचा आधारस्तंभ आपण संचित केलेले ज्ञान असेल तेव्हा माझ्या या ज्ञानकोशाचे कार्य सफल होईल.

आपल्या आयुष्यात एक क्षण असा येईल जेव्हा साम्राज्याच्या व्यवस्थेत अवांछित बदल होतील, तेव्हा तुम्हासर्वांना ठाऊक आहे काय करायचे आहे ते. हाती घेतलेल्या कार्यात आता खंड नको. शतकानंतर शतके येतील, ज्ञानकोशाचे कार्य अविरत सुरु रहाणार यात शंका नाही." सम्राट

# अभ्यंतर

## ४

"सम्राट, अनेक महत्वाचे शोध सिद्धीस जात आहेत. आता कुठला विचार आपल्याला त्रस्त करत आहे?" अंतरा

"ज्ञानकोश" आमच्या काळजीचा विषय नाहीचमुळी. ग्रंथसंस्थापकांना आम्ही राज्यकारभारापासून दूर ठेवले आहे. विवंचना माझ्या विषयातील तृटीची आहे." सम्राट

"सापडली का मग तृटी?" अंतरा

"तृटी? हो ना.." सम्राट

"मला कळले नाही." अंतराने उत्सुकतेने विचारले

"प्रजेचा मानस ओळखणे फार कठीण असते. आपले सारे प्रयोजन त्यांच्या हितार्थ असले तरी प्रजा त्याचा सहर्ष स्वीकार करेलच असे नाही." सम्राट

"जसे?" अंतरा

"सैन्याच्या प्रशिक्षणाकडे आमचे दुर्लक्ष झाले. युद्धबंदी केल्यामुळे आम्हाला त्याची आवश्यकता भासली नाही. परंतु उसळणारे तरुण रक्त,

मातृभूमीसाठी काहीतरी करण्याची तरुण विचारातील तीव्रता, राष्ट्रप्रेमाने भारावलेले तडफदार नेतृत्व यांची मी नकळत दिशाभूल करण्याचे कारण ठरलो आहे. हे सर्व माझ्याविरोधात उफाळून आले तर? याचा विचार करत होतो." सम्राट

"कसे शक्य आहे हे?" अंतरा

"शक्य आहे. प्रजेची विचारधारा केव्हा कुठल्या प्रवाहाकडे आकृष्ट होईल सांगता येत नाही." सम्राट

"काळजी नसावी. आपल्या नेतृत्वांतर्गत समस्त समस्यांवर योजना करण्यात येईल." अंतरा

"काळजी कशी नको करु अंतरे. तुला आठवतं का? माझी उज्जयिनीचा क्षेत्रपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मी सुशीम विरोधात जाऊ नये यासाठी केलीली ती एक राजकीय तडजोड होती. तक्षशिलासारख्या महत्वाच्या व्यापार आणि विद्येच्या केंद्रापासून मला दूर ठेवण्याचे कारण म्हणजे सुशीमची लोकप्रियता वाढून त्याला साम्राज्याचा उत्तराधिकारी नेमणे. अंतर्गत कलहाचा मी निमित्त ठरलो. राधागुप्त आणि इतर विश्वस्तांच्या साह्याने मी षडयंत्रकरून सत्ता बळकावली." सम्राट अशोक खिन्न आवाजात म्हणाले.

"आठवते सम्राट. तुम्ही उज्जयिनी आणि तक्षशिलेतील विद्रोहाचे दमन केले. शत्रु आणि मित्र राज्यात तुमची वाढती लोकप्रियतेची मी एक साक्षीदार

आहे. समस्त प्रजेला आणि मंत्रीपरिषदेला ठाऊक होते सुशीममध्ये एवढे विशाल साम्राज्य सांभाळण्याची शक्ती नाही आणि कुवतही नाही. सीमेवर सतत होणारे परकीय आक्रमण थोपवणे केवळ तुम्हाला शक्य होते. तुम्ही मौर्य साम्राज्याचे  एकमेव योग्य उत्तराधिकारी होते, यात शंका नसावी सम्राट." अंतरा

"महाराज बिंदुसारवर आलेली वेळ माझ्यावर येऊ नये अंतरे." सम्राट अशोक डोळे मिटत म्हणाले

अनेक महत्वाचे शोध सिद्धीस जात होते.

ज्ञानकोशातील विविध विषयांचे ज्ञान प्रयोगाने सिद्ध होत होते.

सिद्धसेन यांचे सांकेतिक भाषा आणि संपर्काचे जाळे पूर्ण झाले होते. या जाळयातून अत्यंत महत्वाच्या संदेशांची देवाणघेवाण वेगाने करणे शक्य होते. ते "संप्रेषण आणि संपर्कशास्त्र" या ग्रंथात विस्तृत माहिती नमुद करत होते.

पुष्पदंत, विविध धातुंच्या निर्मितीची आणि त्याचे विविधांगी उपयोगांची सविस्तर चर्चा लिहित होते. धातुंवर विविध रसायनांचे परिणाम

साधतांना त्यांनी विविध रसायनांची प्रक्रिया, त्यांचे गुण-दोष, दीर्घकाळाने होणारे परिणाम सर्व माहिती "स्थायुर्विद्या" या ग्रंथात नमुद करत होते.

महापद्म, दुर्धर रोगमुक्तीसाठी विविध वनस्पतींच्या प्रयोगातून औषधी, अर्क आणि विषप्रयोगांच्या निर्मितीची प्रक्रिया सिद्ध करत होते. "सुक्ष्मजीवशास्त्र" या ग्रंथात सुक्ष्मजीव व त्यांच्यापासून होणारे अपाय व उपाय सर्वांची नोंद केली जात होती.

अग्नीवेश हे समस्त पृथ्वीचे आणि ग्रहांमधेले अंतर मोजण्याचे सुत्र यांचा अभ्यास करत होते. प्रकाशाची गती आणि त्यावर नियंत्रणेचे सुत्र "तेजोनिधी" या ग्रंथात नमुद करत होते.

मेघनाद, यांनी संशोधनासाठी नालंदा येथे प्रस्थान केले होते. तिथे चिकित्सा माध्यमातून त्याने मानवी संरचनेचा अभ्यास केला. या विषयात अधिक अभ्यासासाठी ताम्रपर्णीवरून काही तज्ञांना बोलवण्यात आले. मानवाच्या विशिष्ट अवयवांवर प्रहार करताच तो मुर्छित करण्याची कला तर प्रचलित होती. स्मृतीभ्रंश आणि त्याच्या पुढे जाऊन वाचा व इतर इंद्रियांच्या

शक्तीस कसे नष्ट करु शकतो याबद्दल "मृत्युंजय" ग्रंथात सचित्र संकलन करण्यात येत होते.

शंखपाल यांचा सामुहिक संमोहन शास्त्राचा प्रयोग यशस्वी झाला होता. मानवाच्या स्मरणशक्तीला सिमित आणि नष्ट करण्याची विधी ते "संमोहनशास्त्र" या ग्रंथात नमुद करत होते.

विरुपाक्ष यांनी एका संदेशवाहक कृत्रीम पक्ष्याची निर्मिती केली. नौकायानात काही फेरबदल करून आपतकालीन स्थितीसाठी तयार करण्यात आले. रथांमध्ये फेरबदल करून रथांची गती वाढवण्यात आली. विमान आणि अनेक नवीन यंत्रणांचे शोध सिद्ध होत होते. सुक्ष्मदर्शकाचा शोध लावून त्याने महापद्माचे कार्य सहज सुलभ केले. गुरुत्वशक्तीचे विविधप्रयोग व त्याबद्दल माहिती त्यांच्या "गुरुत्वशक्ती" या ग्रंथात उपलब्ध होते.

ऋष्यश्रींग यांनी विश्वोत्पत्तीसंबधी विशाल माहिती नोंद करून ठेवली होती. ब्रम्हांडविद्येंतर्गत त्यांनी लहरींचा उल्लेख केला आहे. सुर्यातून मिळत असलेल्या उर्जेचे रुपांतर इतर शक्तीत करणारे सयंत्र निर्मित केले होते.

सौरघट आणि सौरफलकांबद्दल माहिती त्याच्या "ब्रह्मांड्विद्या" या ग्रंथात नमुद केली आहे.

धर्मपाल अर्थात सम्राट अशोक यांच्या "समाजभूषण" या ग्रंथात एक आदर्श समाजव्यवस्था आणि ती प्रदीर्घकाळ टिकण्यासाठी महत्वाची माहिती नमुद केली होती. एक आदर्श राजाच्या कर्तवव्यांवर प्रकाश टाकतांना आदर्श प्रजेची लक्षणे यात सांगितली आहे.

सर्वसामान्यांना अनाकलनीय अशा अनेक गोष्टी प्रत्येक ग्रंथात नमुद करण्यात येत होत्या. हे सर्व ग्रंथ अंतरा सांकेतिक भाषेत लिहित होती.

समाजाचे मानस एक निश्चित दिशेकडे वळवणे सोपे नव्हते. सम्राट अशोकच्या अथक प्रयत्नांनी समाजात प्रदीर्घ काळ सुव्यवस्था नांदत असली तरी समाजातील काही वर्ग असंतुष्ट होता. समाजातील प्रत्येक स्तरावर प्रत्येक वर्गावर नियंत्रण संभव नाही हे सम्राट अशोक यांना ज्ञात होते. सर्वधर्मसमभाव नांदण्यासाठी धर्ममहामात्रांमार्फत सम्राटने एकमेकांच्या धर्माचा आदर करणाऱ्या नीतीचा अवलंब केला. सम्राटचा बौद्धधर्माकिडे वाढता कल बघता ब्राह्मणवर्गातील असंतोष वाढीस लागला.

व्यापार आणि मैत्रीच्या निमित्ताने साम्राज्यात यवनांच्या संचाराने स्थानिक प्रजा चिंतित झाली. अटकेपार व्यापार वाढीस लागला असला तरी त्या निमित्ताने येणारा व्यापारीवर्ग मनमानी करु लागला. त्यामुळे आर्थिक नीतींमध्ये फेरबदल करण्यात आले. परिणामस्वरुप व्यापारीवर्गात आंतरिक कलह् सुरु झाला.

विशाल साम्राज्यात स्वतंत्र प्रांतिक शासनव्यवस्था असली तरी मुख्यनियंत्रणसुत्र सम्राटने त्यांच्या विश्वस्तांच्या सुपूर्त केले होते. या विश्वस्तांची अरेरावी आणि दबावामुळे प्रांतिक सैन्यात अस्थिरता वाढीस लागली. अस्वस्थ ब्राह्मण, व्यापारीवर्गाचा रोष आणि सैन्यातील असंतुष्टता बघून सम्राटने समाजव्यवस्थेत बदल करण्यासाठी त्यांचा शिष्य नचिकेत यांस बोलवून तृटी लक्षात घेऊन नवीन धोरणांचा अवलंब केला.

स्थित्यंतराच्या नोंदींची आवश्यकता लक्षात घेऊन प्रच्छिन्न समितीची बैठक बोलवण्यात आली.

"प्रच्छिन्न समितीची बैठकीसाठी एवढी शिघ्रता का महाराज? संशोधनाचे अयुतपर्ण पूर्ण झाल्यावर आपण भेटायचे ठरवले होते." अंतरा

"काही संकट दबक्या पावलांनी येत असतात. माझे पुत्र आणि पौत्रांच्या वागण्यातील बदल लक्षात घेऊन मी बैठकीचा निर्णय घेत आहे.

शिवाय नवीन पिढी माझ्या देखरेखीखाली तयार झाल्यास अतिउत्तम अंतरे." सम्राट

सम्राट अशोकचा ग्रंथविस्ताराचा संदेश सर्वांपर्यन्त पोहचवण्यात आला. संशोधनासाठी नवीन पिढी तयार करण्याची वेळ आली होती. या नऊ ग्रंथातील ज्ञान नवीन पिढीस हस्तांतरण करण्याआधी सम्राट स्वतः सर्वांना भेटणार होते.

सिद्धसेन, पुष्पदंत, महापद्म, अग्नीवेश, मेघनाद, शंखपाल, विरुपाक्ष, ऋष्यश्रींग आणि धर्मपाल यासर्वांचे शिष्यांसमवेत सांची येथे गुप्त बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्रत्येकाने आत्तापर्यन्त झालेल्या त्यांच्या विषयातील ज्ञानकोशाचा सार समितीपुढे ठेवला. पुढचे नियोजन व त्यासाठी संभावित साहित्याची सूची अंतरेच्या सुपूर्त करण्यात आली. आता सर्वांचे लक्ष सम्राटच्या बोलण्याकडे होते.

"क्षमस्व, प्रत्येक ग्रंथाचे अयुतपर्ण पूर्ण झाल्यावर भेटण्याचे ठरले होते. परन्तु परिस्थिती अशी होती की तातडीने बैठक बोलवावी लागली." सम्राट अशोक हात जोडत म्हणाले

"जनमानसात स्थित्यंतराची लाट उसळली आहे. आपण सर्वांनी अखंड भारताचा विणलेला गोफ कुठेतरी सैल झाला आहे. राजकीय असंतोष आणि असहकार यामुळे ही परिस्थिती ओढवली असली तरी आपण सर्व प्रच्छिन्न समितीचे प्रत्येक सदस्य, संदेशवाहक आणि कार्यवाहक यांनी या परिस्थितीचा सामना करत आपला हेतू साध्य करायचा आहे. आजवर जे सहयोग आणि सहकार्य तुम्हाला शासनव्यवस्थेतून देण्यात येत होते ते असेच अविरत सुरु रहाणार. निधीशिवाय कुठलेही कार्य यशस्वी होऊ शकत नाही. शासनाने याची तरतुद केली आहे. आता अनेक पिढ्या येतील आणि या ध्येयासाठी कार्यरत असतील. त्यांच्यासाठी निधीचे प्रयोजन करण्यात आले आहे. प्रच्छिन्नसमितीच्या पहिल्या शिष्यांच्या पिढीला एक चिन्ह देण्यात येईल. ही एक प्रकारची अभिज्ञानमुद्रा आहे. सुरक्षासमितीच्या सदस्यांकडे चिन्ह अंकित करताच आपल्याला निधी सुपूर्त करण्यात येईल. यापुढे सुरक्षासमिती लुंबिनी येथे कार्यरत असणार. कदाचित कालप्रवाहाच्या ओघात व्यवहार पद्धत बदलण्याची शक्यता नाकारता येत नसली तरी हे चिन्ह आपल्या ध्येयाप्रमाणेच चिरंतन रहाणार आहे." राधागुप्त

"आपल्या निष्णांत शिष्याचा परिचय आणि कार्य कथन केल्यावर समितीची नवीन नियमावली अंतरा प्रस्तुत करणार आहे. यापुढे दोन शतकांनी या भेटीचे आयोजन करण्यात येईल." सम्राट अशोक

"सम्राट माझा शिष्य कच्छप. संपर्कशास्त्रात पारंगत झाला असून उत्तर- दक्षिणेकडे संप्रेषण नियोजनास त्याने आरंभ केला आहे." पूर्वेपासून पश्चिमेपर्यन्त संपर्काचे जाळे तयार आहे. गोपनीय आणि महत्वाचे संदेश अल्पावधीत सहज पोहचवणे आता शक्य आहे." सिद्धसेन

"हा ऋषभसेन, माझा शिष्य. सीमेवरील सतत होणारे आक्रमण थोपवण्यासाठी विस्फोटक आणि अतिसुक्ष्म आयुधांची निर्मिती त्याने आरंभ केली आहे. सीमेवर तसेच तटबंदीवरील सुरक्षादलासाठी मिश्रधातुंचे अभेद्य चिलखतांची निर्मिती सुरु आहे. अचानक आणि विस्तृत परिसरात अग्नीचे प्रसरण झाल्यास सुरक्षा नियोजन तयार आहे. तसेच रसायनांच्या साह्याने विशिष्ट परिसरात सिमीत अग्नी प्रज्वलनाचा प्रयोग यशस्वी झाला आहे." पुष्पदंत

"हा विश्वदत्त, माझा वंशज, सुक्ष्मजीवशास्त्रातील ज्ञानाचा उपयोग दुर्धर रोगमुक्ती आणि वनस्पतीपासून विविध विषौधीची प्रक्रिया आरंभ झाली आहे राजन" महापद्म

"हा चित्राक्ष, माझा शिष्य. ग्रह आणि उपग्रहांच्या स्थित्यंतरामुळे पृथ्वीवर होणाऱ्या विविध परिणामांची माहिती "तेजोनिधी" ग्रंथात अद्यावत करत आहे." अग्नीवेष

"हा अधिरथ, माझा शिष्य. आत्मसंरक्षणविद्येत तज्ञ आहे. मानवाच्या विविध अवयवांवर करण्यात येणारे प्रहारतंत्र, आघात-प्रघाताची पद्धत, त्याचे परिणाम सर्व प्रक्रिया विकसनशील आहे." मेघनाद

"हा प्रत्युषन, माझा शिष्य. संमोहनशास्त्राच्या मदतीने ऐच्छिक कार्य साधण्याचा व्यक्तीविशेष प्रयोग यशस्वी झाला असून त्या व्यक्तीची त्या क्षणातील स्मरणशक्ती सिमित ठेवण्यात यश संपादन झाले आहे सम्राट. स्मरणशक्तीवरील इतर प्रयोग विकसनशील आहे." शंखपाल

"हा मंहेंद्रपाल, माझा शिष्य. स्थल-काल-गतीमापन यंत्रावर काम सुरु आहे. कालगणनेचा प्रयोग यशस्वी झाला आहे. गतिरोधक आणि गतिशील यंत्रणेवर प्रयोग सुरु आहे राजन." विरुपाक्ष

"हा अगस्त्य, माझा शिष्य. राजन, भूकंपनाचे संकेत देणारे यंत्र सज्ज आहे. वृष्टी होणार की अतिवृष्टी, येत्या काळातील एकंदरीत तापमान कसे असणार याचे संकेत मिळणे शक्य झाले आहे. यावरून पिकांचे नियोजन, पाण्याचे नियोजन सर्वांसाठी सुलभ होणार आहेत राजन. भूगर्भातील अनेक चाचण्या यशस्वी झाल्या आहेत." ऋष्यश्रींग

"हा नचिकेत, माझा शिष्य. आदर्श राजा-प्रजा या संकल्पनेसाठी भवतालच्या परिस्थितीचा सर्वसामान्यांवर काय परिणाम होतो, किती काळ रहातो, या परिवर्तानाच्या प्रक्रियेत सामाजिक मानसिकता किती तीव्र असते, आणि या प्रक्रियेला ते कसे सामोरे जातात, किती काळात स्थिर होतात. परिवर्तनानंतर येणारी स्थिरता किती काळ टिकते. ही स्थिरता चिरकाल टिकण्यासाठी मी अशोकचक्राच्या प्रतीकांचा वापर केला आहे. या विशाल साम्राज्यात मी या भूमीवर कुठेही संचार करत असलो तरी माझ्या लाडक्या प्रजेकडे माझे लक्ष आहे हे सिद्ध करण्यासाठी मी प्रमुखस्थानांवर स्तंभ उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रत्येक स्तंभांवर माझ्या आज्ञा लिहिण्याचा मी आदेश दिला आहे." धर्मपाल सम्राट अशोक

"विषयांची व्याप्ती लक्षात घेता ज्ञानकोशाचा विस्तार आवश्यक आहे. हा विस्तार लक्षात घेता संरक्षण समिती नियमावली देत आहे:

*सिद्धसेन, पुष्पदंत, महापद्म, अग्नीवेश, मेघनाद, शंखपाल, विरुपाक्ष, ऋष्यश्रींग, धर्मपाल हे नऊ ज्ञानकोशाचे संस्थापक आहेत. या संस्थापकांचे प्रथम शिष्य हे कच्छप, ऋषभसेन, विश्वदत्त, चित्राक्ष, अधिरथ, प्रत्युषन, महेन्द्रपाल, ऋष्यश्रींग, नचिकेत. ज्ञानकोश हस्तांतरण करतांना प्रत्येक शिष्याला तुमच्या नामाचा पुढचा क्रमांक देण्यात येईल. जसे, नचिकेत प्रथम ह्या आपल्या शिष्याचा उल्लेख नचिकेत द्वितीय...नचिकेत तृतीय....नचिकेत चतुर्थ... असा असेल. ज्ञानकोशाच्या विस्तारासाठी हे आवश्यक आहे. हे ज्ञान पुढच्या पिढीस हस्तांतरित करतांना प्रत्येक ग्रंथावर सांकेतिक लिपीत त्या ग्रंथाच्या संस्थापकाचे नाम, त्या पिढीचा क्रमांक आणि त्यांची माहिती अंकित करण्यात येईल.

*प्रत्येक पिढीतील शिष्य, संदेशवाहक आणि कार्यवाहकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था संरक्षण समितीच्या देखरेखीत करण्यात येईल. नऊ संस्थापक, संरक्षक आणि कार्यवाहकांचे संपर्क जाळे आपणास सिद्धसेन यांनी सांकेतिक भाषेत प्रत्येकाच्या सुपूर्त केले आहे. या सांकेतिक भाषेचे विसंकेतन संरक्षण समितीजवळ सुरक्षित असणार आहे. यात आवश्यक बदल झाल्यास ते सर्वांपर्यंत पोहचवण्यात येतील.

*विसंकेतनाच्या सुरक्षिततेचे उत्तरदायित्व प्रत्येकाचे आहे. त्याचे कुठलेही लिखित अथवा मौखिक प्रसारण कठोर शिक्षेस पात्र ठरेल.

*ग्रंथलेखनाचे अयुतपर्ण पूर्ण होताच संरक्षक समितीस संकेत देण्यात यावे. अतिशिघ्र त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात येईल.

*नवीन पिढीच्या संदेशवाहकांचे प्रशिक्षण सुरु आहे. आवश्यकतेनुसार त्यांची संख्या वाढवण्याचे अधिकार आपण प्रत्येकास आहे.

*दर दोन शतकांनंतर सर्व ग्रंथाचे अवलोकन करण्यासाठी या नऊ ग्रंथाच्या संस्थापकाच्या पिढीस भेटीचे संकेत देण्याची व्यवस्था संरक्षक समितीने केली आहे.

*आपत्तीजन्य स्थितीत आणि अत्यंत आवश्यकता असल्यास एकमेकांस संपर्क करण्यात यावा.

*आम्ही आणि आमच्या येणाऱ्या पिढ्या हे ज्ञान जतन करण्यास वचनबद्ध आहोत." अंतरा

बैठकीत ग्रंथविस्तारासंबधी चर्चा आटोपल्यावर ग्रंथाच्या सुरक्षिततेविषयी चर्चा झाली. हे कार्य अखंड सुरु रहावे यासाठी सम्राटने या प्रच्छिन्न समितीचे नवीन नियम तयार केले होते. आवश्यक तेव्हाच एकमेकांना भेटण्याचे ठरवून आपल्या क्षेत्रात कार्यसिद्धीसाठी प्रच्छिन्न समितीचे सर्व सदस्य निघून गेले.

"अंतरे, तू फार मोठी कामगिरी पार पाडली आहेस. तुझे हे कार्य अजून संपले नाही. माझे लक्ष असले तरी साम्राज्याचा कारभारात मला पुरेसा वेळ मिळणार नाही. तू आनंदीच्या मदतीने या ग्रंथांच्या सुरक्षिततेसाठी पुढची पिढी तयार कर." सम्राट

"होय सम्राट. आपली आज्ञा असेल तर "अपराजिता" आनंदीची कन्या आहे. ती शास्त्र, युद्धकला, अश्वारोहण तसेच अनेक कलांमध्ये पारंगत आहे. तिला या साठी तयार करते." अंतरा

"अपराजिता, योग्य निवड आहे अंतरे. आणि हो, गुप्तहेर संस्थेच्या विस्ताराची गरज आहे. सिद्धसेन आणि कच्छपच्या साह्याने वीस जणांचा एक असे चार गट तयार करा. त्यांच्या प्रशिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यात यावे. त्यातील दहा विश्वस्त आपल्या समितीचे कार्यवाहक असतील." सम्राट

"महाअमात्य, आज राज्यकारभाराचा आढावा घेतांना लक्षात आले, व्रजभुमिक, व्युष्ट या पदांवर अजून व्यक्तींची नियुक्ती आवश्यक आहे. मंत्रीपरिषदेच्या पुढच्या बैठकीत यावर चर्चा करायला हवी." सम्राट

"सम्राट, या नियुक्तींमुळे कोषागारावर अतिरिक्त भार पडणार." महाअमात्य

"करव्यवस्थापनाकडून काय अहवाल?" सम्राट

"अतिवृष्टीमुळे उत्तरेकडील काही राज्यात कर शिथिल केले होते. अपरान्त आणि यवन क्षेत्रात व्यापारातील क्रय-विक्रय दिवसेंदिवस वाढत आहेत. आपले यवनांशी मैत्राचे संबंध आहेत. परकीय व्यापारांवरील कर धोरणांवर विचार करायला हरकत नाही." महाअमात्य राधागुप्त

"अतिउत्तम. यासंबंधी करविभाग आणि महसूल विभाग अध्यक्षांशी वार्ता करून मला अहवाल सादर करा." सम्राट

बहूतेक चक्रवर्तींना येणाऱ्या संकटांची चाहूल लागली असावी. बैठकीत भौगोलिक आणि सामाजिक स्थित्यंतरांची नोंद घ्यायला सांगतांना त्यांच्या आवाजातील कंपन अंतरेस जाणवले होते. विशाल साम्राज्यात एका प्रच्छिन्न समितीचे कार्य अबाधित सुरु रहाण्यासाठी सदस्य आणि कार्यवाहकांचे प्रयत्न सुरु होते. या समितीतील एकेक सदस्य चक्रवर्तींनी स्वतः पारखून घेतला होता. सदस्यांमार्फत या समितीला कुठलाच धोका संभव नसला तरी प्रसंगावधान आवश्यक होते.

-------००००-------

खरं तर सम्राट अशोकच्या धर्माला कुठलेच सांप्रदायिक स्वरुप नव्हते. वेदशाळेच्या निर्मिती आणि शास्त्रार्थासाठी घेतलेल्या वैदिकपरिषदेमुळे ब्राह्मणातील असंतोष कमी झाला होता. स्तुपांच्या निर्मितीमुळे तो परत आकार घेऊ लागला. दैवतांचा कोप नको या भयाने करण्यात येणारे क्लिष्ट यज्ञधर्मापेक्षा बौद्धधर्मातील साधेपणा सम्राटांना भुरळ घालत होता. मुख्यम्हणजे सर्वसामान्यांना तो सहज साधण्यासारखा होता. एका विशाल साम्राज्यातील न्यायव्यवस्था, धर्म व्यवस्था, केंद्रीय शासनव्यवस्था, प्रांतिक शासनव्यवस्था, प्रादेशिक शासनव्यवस्था, नगर शासनव्यवस्था, ग्राम शासनव्यवस्था, यासर्व आदर्श शासनव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी सम्राट आणि त्यांचे विश्वस्त अहोरात्र प्रयत्न करत होते. अथक प्रयत्नांनतरही सीमाप्रदेशातून उठावाची वार्ता सम्राट अशोकला विचलित करत असे.

समाजाला एका सुत्रात गुंफणे हे कलिंग युद्धापेक्षा कठीण आहे, हे सम्राटला लक्षात आले होते. फरक एवढाच याची परिणीती समाधान देणारी होती. या समाधानासाठीच सम्राटचे प्रयत्न सुरु होते. विशाल साम्राज्यात कुठल्या न कुठल्या भागात क्षुल्लक कारणांवरून असंतोष आणि असहकार बघून सम्राटने सर्वत्र सक्तीचे धोरण लागू केले. याचा प्रतिकुल परिणाम होऊन साम्राज्यात द्रोहपर्व आरंभ झाला.

या विशाल साम्राज्याच्या नियत्रंणात व्यस्त सम्राट मात्र त्यांचे ध्येय विसरले नव्हते. नऊ ग्रंथाच्या निर्मिती आणि सुरक्षेकडे त्यांचे विशेष लक्ष होते. प्रच्छिन्न समितीचे सदस्य आणि कार्यवाहकांचे कार्य सुरु होते. समाजात वैचारिक कलह सुरु असतांना ज्ञानकोशाच्या कार्यातील व्यत्यत दूर करण्याचे कार्य अंतरा, आनंदी आणि अपराजिता अविरत करत होते.

कालांतराने............

"अंतरे, इथे ग्रंथालयाच्या बाहेर का घुटमळत आहेस?" राधागुप्त

"महाअमात्य, मी संमतीची प्रतीक्षा करत आहे." अंतरा

"अंतरे, मी आता महाअमात्य नाही. नवीन दौवारिक नियुक्त झालेत. सम्राटला भेटण्यासाठी आता मला देखील संमतीची गरज भासणार बहुतेक." राधागुप्त राजमहालात झालेले बदल आश्चर्याने बघत होते

"सम्राटचे स्वास्थ्य बघायला आलात?" अंतरा

"हो. त्यांनी संदेश पाठवला होता." राधागुप्त

"हो, संदेश मिळताच मी लुम्बिनीवरून तातडीने निघून आले.." अंतरा काळजीच्या स्वरात म्हणाली

"राजमहालात बरेच बदल झालेले दिसत आहेत." राधागुप्त महालात नजर फिरवत म्हणाले

"हो, सम्राट अशोक यांचे शयनकक्ष ही बदलले आहे. पूर्वीसारखे काहीच राहिले नाही." अंतरा ये-जा करणाऱ्या नव्या सेवकांना बघत म्हणाली

"इतका काळ लोटला का अंतरे? इथे आल्यावर वाटत आहे अगदी काही प्रहरांपूर्वी आपण इथेच वावरत होतो." राधागुप्त

"हो, कधीकाळी मी इथे प्रबंधक होती. आता मी फक्त......." बोलतांना अंतरेचा कंठ भरून आला

"सम्राट अशोकची सखी...प्रिय सखी" राधागुप्तचा आवाज बोलतांना दाटून आला.

"राजमहालात विनासंमती कुठल्याही कक्षेत प्रवेश वर्ज्य आहे आर्य. धीर धरा. सेवक येतीलच एवढ्यात" ग्रंथालयात जाणाऱ्या राधागुप्तास अडवत अंतरा म्हणाली

"नवी पिढी, नवे राज्य, नवा डाव, नवे पेच... " राधागुप्त खिन्न आवाजात म्हणाले

"अंतीमसमयी जवळ थांबण्याचा सम्राट अशोकचा आदेश आहे. आपले सम्राट...." अंतराला अश्रु अनावर झालेत.

अंतराला सारखे सम्राटचे शब्द आठवत होतेः "अखंड भारतात धर्मराज्य प्रस्थापित व्हावे म्हणून मी उसळत्या रक्ताला निश्चित दिशा देऊ शकलो नाही. हे उसळते रक्तच आपला घात करतील." आणि तसेच झाले. तक्षशिला-मथुरा-सारनाथ-पाटलीपुत्र-तोसाली-सुवर्णगिरी-सांची-उज्जयिनी-

पट्टाला-अपरान्तच्या पुढे पसरलेल्या या अवाढव्य साम्राज्यात कालांतराने आंतरिक मतभेद आणि कलह  वाढत गेला. अडतीस वर्षे समृद्ध साम्राज्याचा पाया रोवणाऱ्या अशोकाचे स्वास्थ्य बिघडले. सम्राटच्या पुत्रांमध्ये चढाओढ लागली. विद्रोह वाळवीसारखा पसरु लागला. संपूर्ण साम्राज्यावर असलेले एकसुत्री नियंत्रण हळुहळु संपुष्टात येऊ लागले. जसा राजकलह वाढत गेला तसा अंतरेने भवतालच्या परिस्थितीचा अंदाज घेतला. समाजातील वैचारिक घडी विस्कटली होती. त्या क्षणी समाज फारमोठ्या स्थित्यंतराच्या वळणावर उभा होता.  आपले कोण? परके कोण? कळत नव्हते. अशा परिस्थितीत नऊ ग्रंथाचे सांकेतिक लिपीतील भाष्यांतराच्या सुरक्षिततेसाठी अंतरा लुम्बिनीला गेली. ज्ञानकोशाचे योग्य ते नियोजन करून ती पाटलीपुत्रास परत आली तेव्हा सम्राटचे स्वास्थ्य अधिकच खालावले होते.

एकेकाळी चंडअशोक म्हणून प्रसिद्ध असलेला तो धिप्पाड देह आज अस्थिपंजर होऊन शैय्येवर पडला होता. अशोकचे रौद्ररुप बघून युद्धाआधी शस्त्र टाकणारे राजे आज माजले होते. "इतिहासाची पुनरावृत्ती होतेच" सम्राटचे हे वाक्य आज तिला आठवत होते. आपल्याच लोकांनी घात केला होता.

"चक्रवर्ती सम्राट अशोक." अंतराने हलकेच साद दिली.

"सखी...." सम्राट अशोक

"सम्राट, सर्व व्यवस्था करून आले आहे. काळजी नसावी. आपले ध्येय प्रगतीपथावर आहे." अंतरा

"सावलीसारखी सोबत केली तू मला." सम्राट अशोक क्षीण आवाजात म्हणाले

"सम्राट,  मी वचनबद्ध होते आणि आजही आहे." अंतरा सम्राटचा हात हातात घेत म्हणाली

"मी तुला काही देऊ शकलो नाही याची खंत आहे. तू पण वेडी आहेस. चारचौघींसारखा संसार करायचा सोडून माझ्या सोबत खडतर प्रवास करत राहिली. "मी सम्राट झाल्यावर तू माझी मुख्यप्रबंधक असशील" लहानपणी गमतीने म्हणालो होतो मी तुला. तू मात्र तेव्हापासून तुझे वचन पाळतेस....आजही " सम्राट अशोकच्या डोळयातून अश्रु ओघळू लागले

"तुमचा विश्वास आहे माझ्यासोबत कायमचा. मला काही नको." अंतराचा ऊर भरून आला

"सम्राट, तुम्हाला विश्रांतीची आवश्यकता आहे." सम्राटच्या आवाजातील वाढलेली घरघर बघून राधागुप्त म्हणाले

"राधागुप्त." सम्राटने हात जोडून हाक दिली

"सम्राट....." राधागुप्त त्यांचे कृष हात हातात घेत रडू लागले

"सम्राट, आपण सांगितल्याप्रमाणे मातीच्या भांड्यात शाक आणले आहे." अंतरा वाडगे पुढे धरून म्हणाली

"शेवटचे दोन घास...अंतरे." सम्राट क्षीण आवाजात म्हणाले

"या देहाचे भोग संपायला अजून किती वेळ वाट बघावी लागणार आहे?" सम्राट डोळे मिटत म्हणाले

"सम्राट..." अंतराच्या डोळयात महापूर दाटून आला होता

"मी आता सम्राट नाही अंतरे. माझ्या साम्राज्याचा ऱ्हास आरंभ झाला हे ज्ञात आहे मला. इतिहसाची पुनरावृत्ती होते, हे कधीच विसरु नकोस. अखंड भारताचे स्वप्न बघणारे डोळे आत्ता या क्षणी मिटत असले तरी पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या शतकात माझ्यासारखा स्वप्न बघणारा निश्चितच जन्म घेईल. माझा विश्वास आहे. हे दिव्यस्वप्न जो महापुरुष बघेल त्याला माझा या जन्मी कोटी कोटी दंडवत....." सम्राट अशोक हात जोडून म्हणाले

सम्राटची सहनसिद्धी संपुष्टात आली होती. दिव्यस्वप्न बघणारे ते डोळे कोरडे झाले होते आणि मृत्युची वाट बघत होते.

अन्नपाणी सोडल्यावर चक्रवर्ती सम्राट अशोकची प्रकृती दिवसेनदिवस ढासळत गेली. राजवैद्यांचे प्रयत्न सुरु असले तरी विशाल साम्राज्याचा भार वाहून देवांना प्रिय असलेला तो देह थकला होता. यमाच्या पावलांची चाहूल

लागताच त्या थकल्या देहाने अंतरेच्या हातात अर्धा आवळा दिला आणि तो प्रसाद म्हणून संघातील भिक्षुंना वाटून देण्यास सांगितला. ती वेळ जरी शोक करण्याची असली तरी त्यासाठी अंतरेजवळ क्षणाचाही अवधी नव्हता. सम्राटने समुद्रापर्यन्त एकसुत्रात गुंफलेले राज्य-साम्राज्य-महाराज्याची संकल्पना अबाधित ठेवण्यासाठी तिला प्रयाण करणे आवश्यक होते.

चक्रवर्ती सम्राटने दिलेला प्रसाद घेऊन तिने सुवर्णगिरी गाठली. सिद्धसेन, पुष्पदंत, महापद्म, अग्नीवेश, मेघनाद, शंखपाल, विरुपाक्ष, ऋष्यश्रींग श्रमणांच्या वेषात हजर होते. तिने तो अर्धा आवळा देताच त्यांना संकेत लक्षात आला. आपले संशोधन येणाऱ्या पिढीकडे हस्तांतर करण्याचे आणि ते जतन करण्याची प्रतिज्ञा करून ते आपल्या शिष्यांसमवेत भुमीगत झालेत. सांकेतिक भाषेतील त्या गुप्त ग्रंथाच्या रक्षणासाठी अंतरा, अपराजिता आणि आनंदी यांनी लुम्बिनी येथे प्रयाण केले. एक विशाल साम्राज्याची निर्मिती करून समाजव्यवस्थेत एकसुत्रता आणण्याचे स्वप्न पूर्ण झाले असले तरी अशा व्यवस्थेत परिस्थितीचा लाभ घेणारी भ्रष्ट आणि उपद्रवी प्रजा संचार करत असते. विद्रोहाने सद्यस्थितीत समाजव्यवस्थेचा ताबा घेतला असला तरी पुन्हा एखादा चक्रवर्ती येईल आणि या ग्रंथाच्या सह्याने पुन्हा एकदा समाजात एकसुत्रता नांदेल.

"अखंड भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी शतकांनतर एक विजिगीषु राजा येईल. त्याचे नाव चक्रवर्तीप्रमाणे विश्वातील कानाकोपऱ्यात दुमदुमेल. अखंड भारताच्या विकासासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या एका संघटित शक्तीचा तो प्रणेता असेल. जल-थल-आकाशातील तिन्ही शक्तींवर त्याचे प्रभुत्व असेल. आपली कला, संस्कृती, साहित्य, इतिहास आणि ज्ञानकोशाचे तो जतन करेल. शतकोत्तर निस्वार्थ प्रजाहितार्थ कार्यरत त्या प्रेरक शक्तीला माझा दंडवत."

अंतरेच्या मनात-देहात सम्राट अशोकचे हे शब्द रुंजी घालत होते.

शतकामागून शतके जातील. प्रच्छिन्न समितीचे नऊ सदस्य अविरत कार्यरत असणार. शतकामागून शतके आली आणि गेली. अंतरा- आनंदी- अपराजिता यांची नवीन पिढी आजही ज्ञानकोशाचे जतन करत आहे. जीवन समृद्ध करण्यासाठी मनवाला जेव्हा चमत्कारांची आवश्यकता असते तेव्हा या ज्ञानकोशाच्या माध्यमातून नवीन आविष्कार उध्दृत होतो. प्रच्छिन्न समितीचे कार्य अनेक शतके अविरत सुरु रहाणार. ही आशा म्हणजे अभ्यंतर आहे एका विशाल साम्राज्याचे- एका विशाल समाजव्यवस्थेचे. जसे अंधारानंतर प्रकाशाची दिप्ती पसरते तसेच या विद्रोहाचे सावट सरल्यावर चक्रवर्तींना

अपेक्षित असलेले, चाणक्यने वर्तविलेले भविष्य नक्कीच साकार होणार. अखंड भारताची संकल्पना नक्कीच साकार होणार.

-----------समाप्त-----------

**टिपा-**

भेरीघोष- युद्धनिदर्शक घोष

प्रच्छिन्न- गुप्त, अप्रकट

पटिवेदक- सर्वसामान्यजनतेच्या समस्या राजापुढे सांगणारा

प्रतिवेदक- गुप्तहेर, यांना राज्यात सर्वत्र विहार करण्याची परवानगी होती.

दौवारिक-राजवाड्यातील अधिकारी

अंतमहामात्र- सीमासुरक्षा महामात्र

रज्जुक-जमीन मोजणारे अधिकारी

धर्ममाहामात्र- राज्याभिषेक झाल्यावर तेरावर्षांनी अशोकने लोकांचे धर्मजीवन सुरळीत चालावे म्हणुन नेमलेले अधिकारी

युक्त: नेमलेले अधिकारी

पण: नाणी

सुवर्णगिरी- कनकगिरी, म्हैसुर राज्यातील बिल्लारी जिल्ह्यातील ठिकाण

इशिला- म्हैसुरजवळचे सध्याचे सिद्धपुर

ब्रम्हगिरी- म्हैसुरजवळचे ठिकाण

ताम्रपर्णी- सिलोन

सयंत्र- एकापेक्षा अधिक साधी यंत्र जोडून बनवलेले एक महायंत्र

यवन- ग्रीक

व्युष्ट- राज्यात सतत दौरे करून प्रजाहिताचे कार्य व्यवस्थित सुरु असल्याची माहिती पोहचवणारा अधिकारी

प्रादेशिक- प्रदेशाचा प्रमुख

अयुत- दहा हजार

पण्य- निर्यात करण्यात येणार माल

प्रतिपण्य- निर्यात करण्यात येण्याऱ्या मालाच्या मोबदल्यात मिळणारा माल

वैदेहक- व्यापाऱ्याच्या वेषात फिरणारे गुप्तचर

कामान्तिक- शासनाद्वारे संचलित कारखान्यांचा व्यवस्थापक

सन्निधाता- राजकीय कोषव्यवस्थापक

समाहर्ता- अमात्यांतर्गत विविध जनपदांच्या शासनासाठी नियुक्त अधिकारी. विविध अध्यक्ष याच्या अंतर्गत कार्यरत असे:

१. शुल्काध्यक्ष- विविध व्यापारसंबधित शुल्क(कर) एकत्रित करणे.

२. पौतवाध्यक्ष- मोज-मापांवर नियंत्रण करणे

३. मानाध्यक्ष- कालमापन, प्रांत- राज्य-ग्राम इ. सीमा निर्धारित करणे.

४. सूत्राध्यक्ष- शासनाद्वारे संचलित व्यवसायांवर नियंत्रण.(सूत कातणे, कापड विणणे,इतर गृहौद्योग. यात विकलांग, अनाथ, विधवा, बंदी इत्यादी लोकांना काम देण्यात येत असे.)

५.सीताध्यक्ष- कृषिविभागावर नियंत्रण करणे

६. सुराध्यक्ष- सुरा निर्मिती करणे, सुराप्रयोगावर नियंत्रण ठेवणे.

७. विवीताध्यक्ष- पशुंच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, त्यांचे आरोग्य, वन-उपवनातील मार्ग व्यापारांना सुलभ करून देणे

८. कुप्याध्यक्ष- कुप्य पदार्थ अर्थात देवदार, सागवान, खैर, इतर वनौषधीवर नियंत्रण करणे

९. पण्याध्यक्ष- स्वदेशी-विदेशी व्यापाराचे प्रबंध करणे

१०.लक्षणाध्यक्ष- मुद्रापद्धतीवर लक्ष ठेवणे

११.आकराध्यक्ष- विविध मौल्यवान धातुंवर नियंत्रण करणे.

१२. सौवर्णिक-टंकसाळीचा अध्यक्ष

विनीता श्रीकांत देशपांडे

**संदर्भ-**

१) प्राचीन भारत

इतिहास आणि संस्कृत

(लेखक-डॉ.गो.बं. देगलुरकर)

२) पुराभिलेखविद्या

(लेखिका- शोभना गोखले)

३)प्राचीन भारतीय राजनीती

(लेखक-डॉ.रा.शा.मोरखंडीकर)

४)प्राचीन भारतीय राजनीती


(लेखक-सुधाकर देशपांडे)

५)प्राचीन भारतीय संस्थांचा इतिहास

(लेखक-प्रा.गजानन भिडे)

६) विश्वकोश

७)विकीपिडिया


INDIA
250 BCE
EMPIRE OF ASOKA
CEDED BY SELEUKUS NIKATOR
KASHMIR
Srinagar
Oxus
Indus
Ganges
Jumna
Lalita Patan
Pataliputra
Ujjain
Narbada
Tapti
Mahanadi
Godaveri
Kistna
KALINGA
ANDHRA
CHOLA
Kaveri
SATUJA
CHERA
PANDYA
English Miles
0 50 100 200 300 400 500 600

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. विनिता देशपांडे यांचे हे पाचवे पुस्तक.**

विनिता देशपांडे यांच्यासारख्या ज्येष्ठ लेखिका आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१८ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), डॉ. वृषाली जोशी (९ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।